LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही., ५०% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.९२ व ९३ सारडा सेंट्रल, डि.पी. रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३५ वे अंक ३४१ वा फोन २३०१०१ दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ शनिवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 | RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# करायला गेले गणपती झाला मारुती; अनुभव कमी पडला तरीही डॉ.योगेशभैय्यांच्या खेळीचा आणखी एक डाव बाकी

बीड दि.१४ (प्रतिनिधी):– निवडणुकांमध्ये कधीच कोणी कोणाला कमी समजायचं नसतं. राजकारणाचे डावपेच आखतांना कधी दोन पावले मागे तर कधी दोन पावले पुढे जावे लागते. अशा वेळी सर्व परिणामांची तयारीही ठेवावी लागते. बीड नगर पालिका निवडणुकीमध्ये योगेश क्षीरसागरांना अनुभव जरी कमी पडला असला तरी त्यांची आणखी एक खेळी बाकी असल्याचे बोलले जात आहे.



उत्साहाच्या भरात योगेशभैय्या करायला गेले गणपती आणि झाला मारुती अशी अवस्था झाली असली तरी बीड शहरामध्ये डॉ.भारतभूषण क्षीरसागर आणि त्यांचे प्रतिनिधी म्हणून सध्या राजकारणात असलेले योगेश क्षीरसागर यांना माननारा मोठा वर्ग सर्व समाजात आहे. पक्षानेही याचा विचार करायला हवा. याच योगेश क्षीरसागरांनी विधानसभा निवडणुकीत तगडी लढत दिली. त्यांचा निसटता पराभव झाला. अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने मधला मार्ग काढत पक्षांतर्गत गटबाजी वेळीच थांबवायला पाहिजे होती, परंतु आता परिस्थिती हाताबाहेर गेली आहे. याचा फटका पक्षाला नगर पालिका निवडणुकीत बसेल यात शंका नाही.

बीड नगर पालिका निवडणुकीचे उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघे तीन-चार दिवस शिल्लक असतांना अद्याप अजितदादांच्या राष्ट्रवादीचे कोणतेच उमेदवार ह्रअद्याप निश्चित झालेले नाहीत. नगराध्यक्ष पदाचा उमेदवारही अजुन गुलदस्त्यात आहे. ५२ वार्डात कोणते उमेदवार द्यायचे हे ही अद्यापपर्यंत निश्चित झालेले नाही. पक्षांतर्गत बीड शहरात असलेली गटबाजी यामुळे उमेदवार जाहीर करण्यासाठी विलंब होत आहे. या अंतर्गत लाथाळ्यांचा फायदा विरोधकांना निश्चितपणे या निवडणुकीत होईल यात तीळमात्र शंका नाही. योगेश क्षीरसागरांनी या निवडणुकीत अनेक दिवसांपासून लक्ष घातलेले आहे. विधानसभेत आपण चांगले प्रदर्शन केले, शहरात चांगले मताधिक्य मिळविले, त्यामुळे बीड विधानसभेचा अध्यक्ष म्हणून बीड नगर पालिकेच्या निवडणुकीत उमेदवारी जाहीर करतांना आपला विचार घ्यावा, आपल्या मर्जीने उमेदवार घोषीत करावेत अशी त्यांची इच्छा होती. मात्र निवडणूक जाहीर झाल्यापासूनच योगेश क्षीरसागरांच्या विरोधातील गट सक्रीय झाला. त्यामुळे दोन्ही गटांनी वेगवेगळ्या बैठका घेऊन नगर पालिकेच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन चाचपणी केली. याचवेळी पक्षाने तातडीने लक्ष घालून ही गटबाजी क्षमवायला पाहिजे होती, परंतु तसे झाले नाही. पक्षश्रेष्ठी दोघांनाही खेळवत राहिली, याचा परिणाम पक्षालाच भोगावा लागत आहे. १७ नोव्हेंबर हा उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे, अद्याप पान २ वर

## सगळेच पक्ष स्वतंत्र लढणार उमेदवारांची बाहुगर्दी होणार

या निवडणुकीमध्ये बीड नगर पालिकेसाठी जवळपास सर्वच पक्षाने आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवत निवडणूक स्वबळावर लढविण्याचा निर्णय घेतला आहे.
भाजप, शिवसेना शिंदे गट, शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि आता निर्माण होणारा योगेश क्षीरसागरांचा गट तसेच विद्यमान आ.संदीप क्षीरसागरांचा पक्ष असे सर्वच पक्षाचे उमेदवार नगर पालिका निवडणुकीत एकमेकांच्या विरुद्ध लढतांना दिसून येतील. यामुळे एका वार्डातून तीन ते चार पक्षाचे उमेदवार जर उभा राहिले तर मतांच्या विभागणीमध्ये याचा मोठा फटका सर्वच पक्षांना बसणार आहे. बहुरंगी लढतीमुळे काहीही निकाल लागू शकतो असे चित्र सध्या तरी दिसून येत आहे.

## अमरसिंहांच्या नेतृत्वाखाली नाईकवाडे, पटेल, मुळूक ५२ जागा लढविणार









राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये योगेश क्षीरसागर विरुद्ध अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखालील गट ज्यात अमर नाईकवाडे, फारुक पटेल, विनोद मुळूक यांच्यासह अन्य विद्यमान नगर सेवक आहेत. या गटाने योगेश क्षीरसागरांचे नेतृत्व नाकारत त्यांना वगळून अजितदादांच्या राष्ट्रवादीच्या घड्याळ चिन्हावर ५२ वार्डामध्ये उमेदवार उभे करण्यासाठीचा निर्णय घेतला असून त्याची तयारीही सुरु झाली आहे. त्यामुळे बीडमध्ये अजितदादांच्या राष्ट्रवादीतील फूट आता निवडणुकीत स्पष्टपणे जाणवणार आहे.

ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीनेही अर्ज स्वीकारणार

## इच्छुकांना शनिवारी आणि रविवारी सुद्धा उमेदवारी अर्ज भरता येणार

बीड दि.१४ (प्रतिनिधी):- राज्यातील २४६ नगर परिषदा व ४२ नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका २०२५ नामनिर्देशनपत्र म्हणजेच उमेदवारी अर्ज ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही पद्धतीने स्वीकारण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. शनिवार आणि रविवार या सुट्टीच्या दिवशीही सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत उमेदवारांना दोन्ही पद्धतीने उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत.
राज्य निवडणूक आयोगाने सर्व जिल्हाधिकारी आणि मुख्याधिकाऱ्यांना पत्र पाठवून आदेशित केले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येणाऱ्या उमेदवारी अर्जाच्या पत्रामध्ये अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची मुदत १७ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. पान २ वर

## माजलगावात एकाच प्लॉटची दोनदा विक्री करून फसवणूक

### सह दुय्यम निबंधक, ग्रामसेवकसह चौघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल

**माजलगाव दि.१४ (प्रतिनिधी):– शहराजवळील मनुर परिसरातील तीन प्लॉट दोनदा विक्री करून पती–पत्नीची १ लाख ८६ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी प्लॉट विक्री करणाऱ्या दोघांसह सह दुय्यम निबंधक, ग्रामसेवक यांच्याविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की मुस्ताक अब्दुल रजाक खाटीक रा.खाटीक गल्ली माजलगाव यांना मनुर परिसरात प्लॉट विकत घ्यायचा असल्याने त्यांनी त्यांच्या ओळखीचे शेख मुस्तफा शेख रहीम रा.पाटील गल्ली या व्यक्तीशी संपर्क करून प्लॉट घेण्याबाबत बोलून दाखवले असता त्यांनी मनुर ग्रामपंचायत हद्दीत प्लॉट क्रमांक १८२ हे सलीम नजीर शेख याचे प्लॉट विक्री असल्याचे सांगितले ते ६२ हजार रुपयात तुम्हाला घेऊन देतो असे सांगितल्याने मुस्ताक खाटीक यांनी या प्लॉट बाबत ६२ हजार रुपये शेख सलीम नजीर यांना देऊन दिनांक ७ ऑगस्ट २०२४ रोजी खरेदी खत क्रमांक ४३०३/२०२४ हे करून घेतले तर अजून दोन प्लॉट विक्री असल्याचे शेख मुस्तफा याने सांगितल्याने मुस्ताक खाटीक यांनी त्यांची पत्नी रिजवाना मुस्ताक खाटीक हिचे पान २ वर

## अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ केल्या प्रकरणी बापाला ७ वर्षाचा कारावास

बीड दि.१४ (प्रतिनिधी):- स्वतःच्या अल्पवयीन मुलीचा बळजबरीने लैंगिक छळ व मारहाण केल्या प्रकरणी शिरुर तालुक्यातील रहिवाशी असलेल्या आरोपी बापास जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.एस.घोरपडे यांनी दोषी ठरवून ७ वर्ष सश्रम कारावास व १० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास एवढ्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.



अनिल बी.तिडके
सहाय्यक सरकारी वकील

शिरुर तालुक्यात दि.१६ ऑगस्ट २०२४ रोजी आरोपी पिता दारु पिऊन घरी आला व त्याने स्वतःच्या अल्पवयीन मुलीला विनाकारण मारहाण केली. त्यानंतर दि.१७ ऑगस्ट २०२४ रोजी तिचा लैंगिक छळ केला. या प्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरुन शिरुर कासार पोलीस ठाण्यात आरोपी विरुद्ध ७४,७५,७६, पान २ वर

## अंमळनेर पोलीस स्टेशन हद्दीतील पांगरा गावात ३ लाख ६० हजाराचा गांजा पकडला

पिंपळवंडी दि.१४(प्रतिनिधी) :- पाटोदा तालुक्यातील अंमळनेर पोलीस स्टेशन हद्दीतील मौजे पांगरा गावच्या शिवारातील डाग वस्तीवर एका शेतकऱ्याने मोठ्या प्रमाणात तुरीच्या शेतात गांजाची लागवड केल्याची माहीती एक गुप्त खबऱ्यामार्फत मिळाल्यानंतर



अंमळनेर पोलीसांनी अचानकपणे दुपारी १२ वाजता धाड टाकीत शेतकऱ्यांच्या शेतामधील लागवड केलेल्या गांजाची रोपे ताब्यात घेऊन संबंधित शेतकरी जालींदर आश्रुबा मिसाळ यास गजाआड केले असुन गुन्हा दाखल करण्याची पान २ वर

## राज्यात साथीच्या आजारांचा उद्रेक

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी):- राज्यात अनियमित पाऊस, साचलेले पाणी आणि बदलते हवामान या कारणांमुळे डासांची उत्पत्ती वाढली असून, मलेरिया, डेंग्यूचा, चिकनगुनियाचा प्रादुर्भाव वाढत आहे. राज्यात मुंबई मलेरिया, डेंग्यू आणि चिकनगुनियाची हॉटस्पॉट ठरली आहे.
यंदा मे महिन्यातच पावसाला सुरुवात झाली होती. हा पाऊस नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत सुरूच होता. या कालावधीत हवामानात सातत्याने बदल होत असल्याने साथीच्या आजारांनी डोके वर काढले. राज्यात मान्सून परतला असला तरी सध्या साथीच्या आजारांचा प्रकोप सुरूच आहे. आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांत डेंग्यू, मलेरिया, स्वाईन फ्लू, लेप्टोस्पायरोसिस, चिकनगुनिया आणि जलजन्य आजारांचे ३९,७१८ रुग्ण नोंदले पान २ वर

## आ.संदीपभैय्यांनी नगराध्यक्ष पदासाठी सचिन सोनवणे यांना उमेदवारी जाहीर करावी

### सर्व समाजाकडून मागणी

बीड दि.१४ (प्रतिनिधी):- बीड नगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आ.संदीपभैय्या क्षीरसागर यांनी सचिनअप्पा सोनवणे यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी सर्वच समाजाकडून होऊ लागली आहे. सचिन सोनवणे यांना उमेदवारी दिल्यास ते नक्कीच विजयी होतील असा विश्वास देखील व्यक्त केला जात आहे.



बीड नगर पालिका नगराध्यक्ष पदासाठी आ.संदीपभैय्यांनी एकनिष्ठ आणि प्रामाणिक राहून काम करणाऱ्या सचिन सोनवणे यांना संधी द्यावी. स्वच्छ प्रतिमेचा आणि प्रामाणिक चेहरा म्हणून सचिन सोनवणे यांच्याकडे पाहिले जाते. सर्व समाजात त्यांचा दांडगा संपर्क आहे. सर्वांसोबत मिळून मिसळून राहणारे आणि लोकांच्या कामासाठी नेहमी पुढे असणाऱ्या सचिनअप्पा सोनवणे यांना उमेदवारी दिल्यास ते नक्की विजयी होतील असा विश्वास सर्वच समाजाकडून व्यक्त होत आहे. आ.संदीप क्षीरसागर यांनी सचिन सोनवणे यांची उमेदवारी जाहीर करावी अशी देखील मागणी होऊ लागली आहे.

## तलवाडा वृत्तपत्र विक्रेते तथा पत्रकार अनंत कलाल यांचे ह्रयविकाराच्या झटक्याने निधन

तलवाडा दि.१४ (प्रतिनिधी) - गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील रहिवासी असलेले वृत्तपत्र विक्रेते तथा पत्रकार अनंत बाबुराव कलाल (झुटे) यांचे शुक्रवारी मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास अचानक हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले असून मृत्यूसमयी त्यांचे वय ४६ वर्षे इतके होते. गेल्या २५ ते ३० वर्षापासून ते वृत्तपत्र विक्रेते म्हणून काम करत होते. काही काळ त्यांनी पत्रकार म्हणून देखील काम केलेले आहे. त्यांना शुगर व बीपीचा त्रास होता. त्यांची बायपास शस्त्रक्रिया देखील झाली होती. तसेच त्यांना किडणीचा देखील त्रास होता. परंतु सध्या ते व्यवस्थितपणे कामकाज करत होते. सद्यस्थितीत ते वृत्तपत्र वाटप करून महा-ई-सेवा केंद्र चालवित होते. शुक्रवारी मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास त्यांना -ह्दयविकाराचा तीव्र झटका येऊन त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी पान २ वर








| मॉडेल्स | पर्यंतची GST कपात* | + | पर्यंतचे अधिक फायदे* | = | पर्यंतचे एकूण फायदे* |
|---|---|---|---|---|---|
| Grand i10 NIOS Hy-CNG | ₹71 480 | | ₹75 000 | | ₹1 46 480 |
| EXTER Hy-CNG | ₹81 721 | | ₹70 000 | | ₹1 51 721 |
| AURA Hy-CNG | ₹78 465 | | ₹38 000 | | ₹1 16 465 |

3 YEAR Unlimited** Kilometer Warranty
Up to 7 years extended warranty^^
कंपनी फिटेड CNG.
CSD आणि KPKB ग्राहकांसाठी अधिक फायदे##.
6 hai toh safe hai 6 airbags standard
Scan to chat with us or give a missed call at 9555295868
HYUNDAI
दीप ह्युंडई | बीड: जालना रोड, आनंदवाडी, बीड. अंबेजोगाई: तथागट चौक, एच. पी. पेट्रोल पंप समोर, अंबेजोगाई. संपर्क: 9112824445
Hyundai ClicktoBuy Scan here | my Hyundai app | Hyundai Promise Certified Pre-Owned Car
*Terms & conditions apply. *Offers and benefits mentioned are valid till 30th November 2025. Offers and benefits mentioned include cash, corporate, either exchange or scrappage benefits as applicable. Offers and benefits may vary from variant to variant and city to city. ^EMI may differ basis the bank interest, tenure, customer profile, etc. Finance at the sole discretion of financier. HMIL reserves the right to alter or discontinue the deals, benefits or offers at its sole discretion at any time. For more details, visit your nearest Hyundai showroom. **3-year warranty or upto 100 000 km whichever is earlier for Grand i10 NIOS, AURA, i20 & i20 N Line. 3-year unlimited km warranty is applicable for EXTER, VENUE, VENUE N Line, CRETA, CRETA N Line, ALCAZAR, TUCSON, VERNA and IONIQ 5. ^^Up to 7 Years extended warranty is now available for all variants (Petrol/Diesel/CNG) except EV cars and subject to payment. Scrappage bonus will be applicable against a valid certificate of deposit (issued by government approved and operational scrappage center) and exchange of old car. In case the customer is giving certificate of deposit but not physically exchanging his old car and buying a new car – then only scrappage bonus of ₹5 000 will be paid. This advertisement and car shown here is for creative representation purposes only and the depictions are for illustrative purposes. Features and specifications shown may or may not be part of standard fitment and are subject to change without prior notice. Hyundai Motor India Limited reserves the right to change specifications, colour, equipment, and schemes at any time without prior notice. The black shade on glass is due to lighting effect. Size and colour may appear to vary due to lighting and position effect. ##CSD: Canteen Stores Department, KPKB: Kendriya Police Kalyan Bhandar.

# मोबाईलचा वापर टाळावा ; बालपण पुन्हा नाही -संध्या देशमुख

## इंदिरा व मंगलनाथ बालकाश्रम यांच्या संयुक्त विद्यमाने 'बालदिन' उत्सव उत्साहात साजरा



माजलगाव दि.१४ (प्रतिनिधी):- मनुर वसाहत येथील इंदिरा व मंगलनाथ बालकाश्रमात बाल दिनाचे औचित्य साधून बालमनांचा वेध घेत 'बाल उत्सव साजरा करण्यात आला.पंडित जवाहरलाल नेहरू जयंती निमित्त घेण्यात येणाऱ्या बालदिनाच्या निमित्ताने फक्त लहान मुलांची नाही तर मोठ्यांच्याही मनातील बालपण जागे होते. सध्या च्या काळात वाढत्या सोशल मीडियाच्या वेगाने बालमन सुद्धा अगदी वेगात प्रौढतेकडे धावत असलेली दिसून येत आहे. म्हणूनच तर अल्पवयातही मोठ्या भिंगाचा चष्मा, अकाली पांढरे केस ,स्थूलता,सारखे गंभीर प्रश्नही सर्वसामान्य वाटत आहेत त्यासाठी मुलांनी मुलांसारखेच वागावे ,जगावे आणि बालपण मनसोक्त अनुभवावे. कारण बालपण पुन्हा नाही असे मोलाचे मार्गदर्शन संस्था संचालिका संध्या देशमुख यांनी व्यक्त केले. कार्यक्रम प्रसंगी अधीक्षक राजेश सुरवसे , प्रभाकरराव कुलकर्णी , नवनाथ कदम, अर्जुन गायगवे, पांचाळ, श्रीमती चौरे, अशोक एकर, गणपत प्रधान व सर्व कर्मचारी,विद्यार्थी वर्ग उपस्थित होते . बाल दिनाच्या निमित्ताने विविध खेळांचे आयोजन करण्यात आले, मुलांना मनसोक्त खेळू, बागडू देण्यात आले,तर विद्यार्थ्यांनी विविध गुण प्रदर्शन ही सादर केले.

# पहाटेचा अचानक स्फोटासारखा हादरा हॉटेल पिंगळे वाडा आगीत जळून खाक

बीड दि.१४ (प्रतिनिधी):- १३ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे ०५:१२ वाजता पंचशीलनगरात स्थित हॉटेल पिंगळे वाडा (वेज अँड नॉनव्हेज) येथे अचानक लागलेल्या भीषण आगीने परिसराला अक्षरशः धावपळ उडाली. घनदाट धूर, आगीच्या ज्वाळा आणि पेटलेल्या साहित्याचा स्फोटक आवाज ऐकू येताच नागरिकांनी तत्काळ अग्निशमन विभागाला कळविले. या घटनेची माहिती मिळताच बीड अग्निशामक दलाचे वाहन MH 02 GH 5732 घटना स्थळी धावून गेले. अग्निशमन अधिकारी श्री. किशोर जाधव, फायरमन रमेश आदमाने आणि चालक सुशील काळे यांनी कोणतीही वेळ न दवडता परिस्थितीचा धोकादायक वेगात सामना करत आग पूर्णपणे विझवली. दलाच्या अचूक, वेगवान आणि निर्भीड कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला. आगीची तीव्रता पाहता मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता होती. आगीचे कारण निश्चित झाले नसून शॉर्टसर्किटचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. पुढील तपास सुरू आहे. या आगीमुळे हॉटेलमधील साहित्य जळून खाक झाले असून लाखो चे नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे.



बीड दि.१४ (प्रतिनिधी):- शहरात मोकाट जनावरांमुळे व कुत्र्यांमुळे नागरिक त्रस्त आहेत. नगर परिषदेने कोंडवाड्याकडे लक्ष देऊन सर्व मोकाट जनावरे तिथे भरती करावेत अशी मागणी होत आहे.

# लक्ष्मी जिनिंग अँड ऑइल मिलला भीषण आग

## अग्निशामक दलाच्या धाडसी प्रयत्नाने मोठी दुर्घटना टळली

बीड(प्रतिनिधी):- शहरापासून जवळच असलेल्या बहिरवाडी एमआयडीसी परिसरातील लक्ष्मी जिनिंग अँड ऑइल मिल येथे १४ नोव्हेंबर संध्याकाळी ०४.४४ वाजता भीषण आग लागण्याची घटना घडली. अचानक लागलेल्या आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केले.परिसरात मोठ्या प्रमाणावर ऑईल व केमिकल्स असल्याने परिस्थिती धोकादायक बनली होती. आगीची तीव्रता अधिकच वाढल्याने याची माहिती बीड अग्निशामक दलाला दिल्यानंतर तात्काळ बीड अग्निशमन दलाचे वाहन कर्मचारी हे घटनास्थळी येऊन आग आटोक्यात आणली.अग्निशामक दलाचे वाहन क्रमांक MH 02 GH 5732 तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन अधिकारी किशोर जाधव, लीडिंग फायरमन कृष्णा जंगले आणि फायरमन रमेश आदमाने यांनी तत्काळ बचावकार्य सुरू केले.आगीचा फैलाव मोठा असून केमिकल्सचा साठा असल्याने गेवराई नगरपरिषदेचे एक तसेच गेवराई बाजार समितीचे एक अशा आणखी दोन अग्निशमन वाहनांना पाचारण करण्यात आले. सर्व वाहनांच्या मदतीने केलेल्या प्रयत्नांनंतर आग पूर्णतः आटोक्यात आली.

पान १ वरुन

### डॉ.योगेशभैय्यांच्या खेळीचा आणखी एक डाव बाकी

अजितदादांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार जाहीर झालेले नाहीत. जे इच्छुक उमेदवार आहेत ते ही संभ्रमात आहेत. आपल्याला उमेदवारी कोणाकडून मिळणार ? योगेशभैय्या की त्यांच्या विरोधातील गटाकडून याचाही त्यांना मेळ बसत नाही. योगेशभैय्यांना अनुभव कमी पडला असे म्हणावे लागेल. त्यांनी नगर पालिकेची संपूर्ण निवडणूक स्वत:च्याच नेतृत्वाखाली लढण्याचा त्यांचा आग्रह अंगलट आला. राजकारणात भविष्यातील काही शब्द आणि मिळणाऱ्या संधी लक्षात घेऊन तडजोडी कराव्या लागतात, यात योगेशभैय्या कमी पडले असेच म्हणावे लागेल. त्यांनी पक्षश्रेष्ठींकडे केलेल्या मागण्या श्रेष्ठींना कदाचित अवास्तव वाटल्या असतील परंतु चर्चेतून मार्ग निघतात, थोडे संयमाने घ्यायला पाहिजे होते ते घडले नाही. परिणामी आता योगेश क्षीरसागर हे आघाडीची खेळी करुन निवडणूक रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. भाजप सोबत आघाडी केली तर आघाडीच्या सर्व उमेदवारांना एक चिन्ह मिळेल याची शाश्वती नसते. त्यासाठी पुर्वीच प्रशासनाकडे आघाडीचे रजिस्ट्रेशन करावे लागते. योगेशभैय्यांनी कदाचित ते केलेही असेल, त्यामुळेच इतक्या विश्वासाने ते आघाडीतून निवडणूक लढविण्याच्या निर्णयावर येऊन पोहोचले आहेत.

### माजलगावात एकाच प्लॉटची दोनदा विक्री

नावावर त्याच हद्दीतील क्रमांक ४५ व २४६ हे सलीम नजीर शेख, शेख मुस्तफा या व्यक्ती कडुन खरेदी केले व त्या प्लॉटचे रजिस्टर खरेदीखत शेख मुस्तफा, सलीम नजीर शेख यांनी बोगस कागदपत्रे शरद भांडेकर यांच्या सत्यम कॉम्प्युटर्स येथे तयार करून दुय्यम निबंधक कार्यालय माजलगाव येथे करून दिले यानंतर पंधरा दिवसाच्या कालावधीनंतर मुस्ताक अब्दुल रजा खाटीक हे सदर प्लॉटला त्यांचे नावाचा फेर लावण्यासाठी मनुर ग्रामपंचायतचे ग्रामसेवक अनिल दाऊतसरे यांच्याकडे गेले असता त्यांनी नाव लावण्यास टाळाटाळ करत उडवा उडवीचे उत्तरे देत नाव लावण्यास नकार दिला. यानंतर मुस्ताक खाटीक हे सदर प्लॉटवर कब्जा घेण्यासाठी गेले असता तिथे असलेल्या कबजेदारांनी सदर प्लॉट हे आम्ही २०२२/२३ मध्ये रीतसर विकत घेतले असल्याचे सांगितले व खरेदी दस्त दाखविला त्यामुळे मुस्ताक खाटीक यांना आपली फसवणूक झाली असल्याचे लक्षात आले त्यांनी ताबडतोब शहर पोलीस स्टेशन गाठून प्लॉट विक्री करणारे, खोटे ना हरकत प्रमाणपत्र देणारे मनुर ग्रामपंचायत चे ग्रामविकास अधिकारी अनिल दाऊतसरे, कागदाची पडताळणी न करता दस्त नोंदविणारे सह दुय्यम निबंधक माजलगाव व तेथील कर्मचारी यांच्या विरुद्ध फिर्याद दाखल केली असून माजलगाव शहर पोलीस पुढील तपास करीत आहेत. बोगस कागदपत्राद्वारे दस्त नोंद करणाऱ्या माजलगावातील अनेक टोळ्या असून ते कॉम्प्युटर सेंटरवर बोगस कागदपत्रे तयार करून अनेकांना फसवत असून या लोकांवर कारवाई करण्याची मागणी जनतेतून होत आहे. येथील तत्कालीन स दुय्यम निबंधक यांनी ४६५१/२०२४ हा दस्त दिनांक २७रोजी नोंद केलेला आहे मात्र याला ना हरकत प्रमाणपत्र हे २८ रोजी चे जोडले आहे तर ग्रामसेवक अनिल दाऊदसरे यांनी शेख सलीम नजीर व शेख मुस्तफा यांची मिळकत नसताना त्यांना नमुना आठ व रजिस्ट्री साठी लागणारे ना हरकत प्रमाणपत्र दिल्याने यांचा आरोपी मध्ये समावेश झाला आहे.

दि.१४/११/२०२५

**जाहीर प्रगटन**

**जाहीर प्रगटन देणार –**

**१) फिरोज महंमद हुसैन कुरेशी २) एकबाल मोहम्मद हुसेन कुरेशी, ३) शरीफ मोहम्मद हुसेन कुरेशी ४) ताहेराबी भ्र.मोहम्मद हुसेन कुरेशी**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, जाहीर प्रगटन देणार यांची शिवार वडवणी गट क्रमांक ६५७ मधील एकुण १२.५ एकर शेत जमीन असून ह्यापैकी काही जमीन लतीफ लाला खान पठाण,रा.चिखलबीड यांना विक्री केली आहे. ज्याची चतु:र्सिमा पुर्वेस - किस्किंदा भ्र.दिनकरराव आंधळे यांची जमीन, पश्चिमेस - आमची जमीन, दक्षिणेस : बीड-परळी हायवे रोड, उत्तरेस : गेणा पाटोळे व रामकिसन गायकवाड यांची जमीन. उपरोक्त चतु:र्सिमा अंतर्गत असलेली जमीनीचे मालक व कब्जेदार हे जाहीर प्रगटन देणार आहे. त्यांच्या उपरोक्त जमिनीचे सातबारा पत्रकावर मालकी व कब्जेदार म्हणून नावे आहे. उपरोक्त जमीन बेकायदेशीर व कोणतेही अधिकार नसताना १) नसरिन बानो भ्र.अब्दुल रहीम कुरेशी २) अब्दुल्ला पि. अब्दुल रहीम कुरेशी ३) मोहम्मद अशफाक पि.अब्दुलरहीम कुरेशी, सर्व राहणार वडवणी, ता.वडवणी जि.बीड हे बेकायदेशीर बनावट पी.टी.आर. एन.ए. लेआऊट सह इतर कागदपत्रांद्वारे बनावट तयार करुन इतर लोकांना विक्री व्यवहार करत असल्याचे खात्रीलयक माहिती मिळाली आहे. सदर शेत जमिनीचे जाहीर प्रगटन देणार यांनी मा.जिल्हा न्यायालय माजलगाव, दिवाणी न्यायालय (क.)स्तर वडवणी व उच्च न्यायालय खंडपीठ माजलगाव, दिवाणी न्यायालय (क.) स्तर वडवणी व उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद, महसुली न्यायालय प्रकरणी वाद चालु आहे. सदर मिळकतीमध्ये या जाहीर प्रगटन देणाऱ्याचा कायदेशीर हिस्सा असल्यामुळे सदर मिळकतीमध्ये या जाहीर प्रगटन देणाऱ्याचा कायदेशीर हिस्सा असल्यामुळे सदर मिळकती बाबत वरील लोकांसोबत कोणताही इसार पावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, दानपत्र किंवा इतर कोणत्याही मार्गाने व्यवहार करु नये. तरी या निवेदनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील नमुद केलेल्या जमिनीशी दिलेल्या चतु:र्सिमेच्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कोणत्याही प्रकारचा कोणत्याही व्यक्तिंनी कसलाही व्यवहार वरील कोणत्याही लोकांसोबत खरेदी-विक्री करु नये, नसता त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई व फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, तसेच याची सर्व जबाबदारी खरेदी करणाऱ्याची राहील. करिता सबब जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

**ॲड.सुधीर खाडे**
**मो.नं.८२७५३२६६६५**

16186-13356

### अनंत कलाल यांचे निधन

घटना घडली असून या घटनेमुळे कलाल कुटुंबियांवर अक्षरशः दुःखाचा डोंगर कोसळा आहे. त्यांच्या मृतदेहावर शुक्रवारी सकाळी ठिक ११ वाजता स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, व्यावसायिक व पत्रकारिता क्षेत्रातील शेकडो हितचिंतकांसह हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन भाऊ, तीन बहिणी, मेहुणे असा परिवार आहे. कलाल कुटुंबियांच्या दुःखात पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

### मुलीचा लैंगिक छळ ; बापाला ७ वर्षाची शिक्षा

११५, ३५२ बीएनएस आणि कलम ८,१०,१२ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस उपनिरीक्षक डी.आर. कुलकर्णी यांनी तपास करुन बीड जिल्हा व सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणी जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.एस.घोरपडे यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. सरकार पक्षातर्फे ६ साक्षीदार तपासण्यात आले. पीडिता, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचा पुरावा व सहाय्यक सरकारी वकील अनिल बी.तिडके यांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन न्या.घोरपडे यांनी आरोपीस ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. सदर प्रकरणात सहाय्यक सरकारी वकील अनिल बी.तिडके यांनी काम पाहिले. त्यांना जिल्हा सरकारी वकील अजय दि.राख यांनी मार्गदर्शन केले. तर पैरवी अधिकारी पोलीस कॉन्स्टेबल सुरेश कदम यांनीही सहकार्य केले.

### इच्छुकांना शनिवार आणि रविवारीही उमेदवारी अर्ज भरता येणार

उमेदवारी अर्ज दाखल करण्याचे शेवटचे दोन दिवस शिल्लक राहिलेले आहेत. अशा परिस्थितीत ऑनलाईन संकेत स्थळावर भार देण्याची शक्यता लक्षात घेता व उमेदवारांना समान संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने आजपासून पुढील तीनही दिवस १५,१६ आणि १७ नोव्हेंबर पर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. दि.१६ नोव्हेंबर रोजी सुट्टी असली तरी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारांना ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने देखील आपले उमेदवारी अर्ज कागदपत्रांसह संबंधीत निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर करता येणार असल्याचे आदेशात म्हटले आहे.

### अंमळनेर हद्दीत गांजा पकडला

प्रक्रिया सुरु असल्याचे सांगण्यात आले. सदरील गांजाची बाजारभावाने ३ लाख ६० हजार किंमत आहे. सदरील कामगिरी पोलीस अधिक्षक नवनीत काँवत,अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर,स.पो.अधिक्षक हानपुडे पाटील,तात्पुरता पदभार असलेल्या उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अंमळनेर पोलीस स्टेशनचे सपोनि भार्गव सपकाळ, पो.उपनिरीक्षक कृष्णा चव्हाण, स.फौ. मंजुळे, पो.हे.सांगळे, पोहे. तरटे,पो.काँ. बहिरवाळ,पो.काँ.राठोड,पो. काँ.शेळके,पो.काँ. कसाब, गोपनीयचे पो.काँ.शाम खाडे आदींनी कार्यवाही केली.या सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### राज्यात साथीच्या आजारांचा उद्रेक

गेले असून ३८ जणांचा मृत्यू झाला आहे. मलेरिया व डेंग्यू या डासजन्य रोगांनी ग्रामीण तसेच शहरी भागांमध्ये गंभीर परिस्थिती निर्माण केली आहे. आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, ७ नोव्हेंबरपर्यंत राज्यात मलेरियाचे २०१६६ रुग्ण आणि १५ मृत्यू, तर डेंग्यूचे १२३५१ रुग्ण नोंदवले गेले आहेत. याशिवाय, जलजन्य आजारांमध्ये कॉलरा(१९१), पिवळा ताप(६८७), गॅस्ट्रोएन्टरायटिस (४३), अतिसार(१२३४) आणि टायफॉईड (२२) रुग्ण आढळले आहेत. बर्ड फ्लूचीही ७३ प्रकरणे नोंदली गेली आहेत.

**कागदपत्रेहरवलेआहे**

कॉलेजचे ओरिजनरल मार्कमेमो व इतर महत्वाचे कागदपत्र बीड बसस्टॅण्ड ते बलभीम चौक ॲटो रिक्षाने प्रवासाच्या दरम्यान हरवले आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

– संपर्क –
अंधुरे आदिती अशोकराव
बलभीम चौक, बीड.
संपर्क – ९८६०२२१५६१

पान ६ वरुन

### अंबाजोगाई न.प निवडणुकीत

मतदार संघातून ॲड.इस्माईल गवळी (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार) यांनी २ उमेदवारीचे २ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असुन असं एकूण २ उमेदवारांचे ३ नामनिर्देशन पत्र प्राप्त आहेत.तसेच नगराध्यक्ष पदासाठी एकही नामनिर्देशन पत्र प्राप्त नाही. अशी माहिती नगर परिषदेचे निवडणूक अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांनी दिली.

### सोमवारची गर्दी टाळण्यासाठी

निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार संदीप खोमणे, सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी विक्रम मांडुरके आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी संजय सोनवणे यांनी केले आहे. गेवराई शहरातील ११ प्रभागातील २२ उमेदवारांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी नगरपरिषद सभागृहामध्ये प्रभागानुसार वेगवेगळे टेबल लावण्यात आले आहेत. नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवारांसाठी स्वतंत्र टेबल लावण्यात आले आहेत. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी सर्व कर्मचारी व अधिकारी प्राधान्याने काम करत असताना दिसत आहेत.

### ढेकणमोहा पं.स.गणाच्या विकासासाठी

आणि ग्रामस्थांच्या अपेक्षा या पार्श्वभूमीवर आगामी राजकीय घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### बीडमध्ये दादांच्या राष्ट्रवादीचा नवा अध्याय

निवडणुकांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग वाढविण्याचे उद्दिष्ट असल्याचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी सांगितले. गावपातळीवर पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी आणि स्थानिक जनतेपर्यंत अजितदादांच्या विकासदृष्टीचा संदेश पोहोचविण्या साठी ही निवड महत्त्वाची ठरणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या नियुक्त्यांमुळे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला नवचैतन्य प्राप्त होईल, तसेच स्थानिक निवडणुक मध्ये युवकांची ऊर्जा आणि सहभाग निर्णायक ठरेल, अशी अपेक्षा आहे असे अजित दादा पवार गटाकडून बोलले जात आहे.

### बीड नगराध्यक्ष पद हा महिलेचा अधिकार–चांदणे

महिलांना कुठल्याही अधिकारावर बसू देणार नाहीत.. म्हणून बीड नगराध्यक्ष पदावरवर पुरुषांनी आपला अधिकार गाजवू नये ...! असे परखड मत बीड नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदाच्या संभाव्य उमेदवार प्रेमलाताई चांदणे यांनी केले

### गेवराई नगराध्यक्ष पदासाठी तिघांचे ५ तर

१४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत नगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सौ दाभाडे शितल महेश, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सौ साळवे संदीप मारुती यांचे दोन आणि सौ चाळक संजीवनी मनोहर यांचे दोन अशा तीन उमेदवारांचे पाच उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. सदस्य पदासाठी गुंजाळ विलास दौलत, मुळे श्रीकृष्ण विश्वनाथ, निकम किरण तुळशीराम, शेख नजमा बेगम निजाम, कांडेकर वैशाली किशोर यांचे १३ नोव्हेंबर २०२५ रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी मडके दिपाली रोहित, येवले संध्या राधेश्याम, निकम संतोष ज्ञानोबा, पवार गंगासागर विठ्ठल, धुरंदरे अनिता ब्रह्मदेव, संभाहारे रेणुका शिवलिंग, शरीफ जाकेरा बेगम इस्माईल, शेख खाजा कट्टूमिया, सय्यद आशिया सफयोदिन, सय्यद आलिया फिरदोरा बद्रुद्दीन, सौंदरमल महेश मधुकर, बेदरे माधव उत्तमराव, सय्यद एजाज इफ्तेखार अहेमद, पवार विठ्ठल एकनाथ, गायकवाड राजाभाऊ लक्ष्मण, कुरेशी शाहरुख कुरेशी छोटूमिया, शेख शेहदाद सादेक या २२ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले असल्याची माहिती गेवराई नगरपरिषद निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार संदीप खोमणे सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी विक्रम मांडुरके आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा नायब तहसीलदार संजय सोनवणे यांनी दिली आहे.

### लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर

करताना ऊसाला दिलेला यथोचित व स्पर्धात्मक दर, साखर उत्पादनातील गुणवत्ता, उत्पादन खर्चातील सुव्यवस्था आणि कारखाना व्यवस्थापनातील पारदर्शकता यांचा उत्तम संगम साधला आहे. त्याचबरोबर कारखान्याच्या व्यापक विकासासाठी इथेनॉल उत्पादन, को. जनरेशन प्रकल्प (बिज उत्पादन), प्रेसमड व बायो फर्टीलायझर उत्पादन, डिस्टिलरी, कचरा व्यवस्थापन, बायोगॅस प्रकल्प यातील काही जोड व्यवसायांचे यशस्वीपणे संचालन करुन शाश्वत विकासाचे मॉडेल निर्माण केले आहे. या सर्व उपक्रमांव्दारे शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ, स्थानिक अर्थव्यवस्थेची मजबुती आणि ग्रामीण भागातील रोजगार निर्मातीस मोठा हातभार लागलेला आहे. सहकार मुल्यांवर आधारीत या प्रगत, पारदर्शक आणि समाजाभिमुख कारखाना व्यवस्थापनाच्या गुणांचा अभ्यास करुन वरील संस्थांनी कारखान्याची ग्रीन वर्ल्ड को. प्राईड-२०२५ या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.सदरील पुरस्काराचे वितरण दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी सहकार सभागृह कॉसमॉस को.ऑप. बँक लि, शिवाजीनगर पुणे येथे सन्माननीय केंद्रीय मंत्री व राज्यातील विविध खात्याचे मंत्री यांचे प्रमुख उपस्थितीत होणार आहे. सदरचा प्रतिष्ठेचा पुरस्कार कारखान्यास मिळालेबद्यल सर्व सभासद, संचालक, अधिकारी, कर्मचारी, हितचिंतक यांचे वतीने कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक आ.प्रकाशदादा सोळंके, धैर्यशीलकाका सोळंके, चेअरमन विरेंद्रदादा सोळंके, व्हा. चेअरमन जयसिंगभैय्या सोळंके, कार्यकारी संचालक आर. सी. बडगुजर यांचे अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.

### दिवसा घरफोडी करणारा अट्टल गुन्हेगार सापळा रचून पकडला

हॉटेलवर जेवणाचे पार्सल घेण्यासाठी येणार आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी तात्काळ पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांची टिम रवाना केली. स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी सदरील ठिकाणी सापळा लावला. संदीप ईश्वर भोसले हा जेवणाचे पार्सल घेण्यासाठी तिथे आला असता त्याला पोलीस आल्याचा संशय आल्याने तो पळण्याचे तयारीत असताना तेथे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी झडप मारुन जागीच पकडले. परंतु त्याला मोटार सायकलवर घेवुन आलेला दुसरा आरोपी भगवान ईश्वर भोसले हा शेतामध्ये उसाचा आसरा घेवुन पळून गेला.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने आरोपी संदीप ईश्वर भोसले ( बेलगांव ता. कर्जत जि. अहिल्यानगर ).यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे बीड जिल्हयातील केलेल्या घरफोडी बाबत चौकशी केली असता त्याने बीड जिल्हामध्ये पिंपळनेर, अंमळनेर, नेकनुर व शिरुर भागात संदीप याचा भाऊ भगवान ईश्वर भोसले याचे मदतीने चोऱ्या केल्याचे कबुली दिली आहे. आरोपी संदीप ईश्वर भोसले याच्याकडून दिवसा घरफोडी केल्याचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. त्याचे कडुन चोरून नेलेल्या मुद्देमालापैकी एकुण ४,४१,१०० रु सोने व चांदीचे दागीणे व नगदी व गुन्हयात्त वापरलेली मोटार सायकल ९०,०००/- रु असा एकुण ५,३१,०००/- रु किमतींचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आले आहे. आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी पोलीस ठाणे पिंपळनेर याचे ताब्यात देण्यात आले आहे.पोलीस ठाणे पिंपळनेर गु.र. नं २२३/२०२५ कलम ३३१(३), ३०५ बी.एन.एस. पोलीस ठाणे पिंपळनेर गु.र. नं २२६/२०२५ कलम ३३१ (३), ३०५ बी.एन.एस. पोलीस ठाणे अंमळनेर गु.र.नं १४८/२०२५ कलम ३३१ (३), ३०५ बी.एन.एस. पोलीस ठाणे नेकनूर गु.र.नं २७०/२०२५ कलम ३३१(३), ३०५ बी.एन.एस

पोलीस ठाणे शिरुर गु.र. नं २८९/२०२५ कलम ३३१ (३), ३०५ बी.एन.एस याप्रमाणे गुन्हे उघडकीस आले. आरोपीनामे संदीप ईश्वर भोसले ( वय ३० वर्ष, रा बेलगांव ता.कर्जत जि. अहिल्यानगर ) हा पोलीस अभिलेखावरील आरोपी असुन त्याच्यावर दरोडा, चोऱ्या, घरफोड्या, खुन, खुनाचा प्रयत्न या सारखे २० पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहे. त्याचे वर यापुर्वी म.को.का प्रमाणे कारवाई देखील करण्यात आलेली होती.सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक नवनित काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. धनराज जारवाल, पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार सोमनाथ गायकवाड, अशोक दुबाले, बाळु सानप, राहुल शिंदे, विकास राठोड, अंकुश वरपे, आश्पाक सय्यद, मनोज परजणे, विकी सुरवसे, चालक पोलीस हवालदार नितीन वडमारे, सिध्दार्थ मांजरे यांनी केली आहे. पुढील तपास स्थागुशा, बीड व पोलीस स्टेशन पिंपळनेर येथील पोउपनि. विलास तुपारे व पोअं.विश्वास मगर, सादेक पठाण हे करत आहेत.

### प्रभाग ९ मधून शेख मेहराज यांचा उमेदवारी अर्ज दाखल

प्रतिमा एक ग्राउंड-लेवल लीडर म्हणून निर्माण झाली आहे.प्रभाग ९ मध्ये नवी समीकरणे अर्ज दाखल झाल्यानंतर प्रभाग ९ मध्ये राजकीय चर्चांना वेग आला आहे. विविध पक्षांतील नेत्यांचे समीकरण, मतदारांचे आकडे आणि स्थानिक गट-तट यामुळे हा प्रभाग महत्त्वाचा ठरणार आहे. शेख मेहराज यांच्या उमेदवारीमुळे स्पर्धा अधिकच रंगणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

### माजी जि.प.सदस्य गो.गो.मिसाळ

व सौ.लताबाई गोपाळराव मिसाळ यांचा त्यांची मुले सत्यसेन,डॉ.चित्रसेन,सुना सौ.संगीता, सौ.सुषमा,मुलगी सौ.वृषाली,जावई डॉ.अनिल सानप यांनी पाद्यपूजन केल्यानंतर सरांचे सर्व आप्तेष्ट नातेवाईकांकडून औक्षण व अभिष्टचिंतन नेत्रदिपक सोहळा संपन्न झाला.या कार्यक्रमात श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ.नामदेव शास्त्री महाराज यांच्या हस्ते गो.गो.मिसाळ सर यांच्या जीवनावरील माझ्या पाऊल खुणा या पुस्तिकेचे संत-महंत व मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात आले.तसेच गो.गो.मिसाळ यांच्या जीवनावरील स्क्रीनवर चित्रफित दाखवण्यात आली.यावेळी महंत नामदेव शास्त्री म्हणाले,गो.गो. मिसाळ सर यांनी त्यांच्या जीवनात शैक्षणिक,धार्मिक,राजकीय,कृषी क्षेत्रात ज्यांना ज्यांना सहकार्य केले ते सर्व अभिष्टचिंतन सोहळ्याला सरांना शुभेच्छा व आशिर्वाद देण्यास आले. सरांनी ज्यांना ज्यांना सहकार्य केले ते स्वतःच्या पायावर उभा राहिलेत तसेच त्यांनी सरांचे उर्वरित आयुष्य येथून पुढेही सुखाचे जावो असा शुभाशिर्वाद दिला.गो.गो.मिसाळ सर म्हणाले की, मी नारायणगड या तीर्थस्थळी तुळशी माळ घातली.श्री.क्षेत्र नारायण गड, भगवानगड,गहिनीनाथ गड, अश्वत्थलिंग संस्थान व संत वामनभाऊ,संत भगवान बाबांच्या आशिर्वादाने मी सामान्य कुटुंबातील ऊसतोड कामगारांचा मुलगा कर्तबगार बनलो हे माझे भाग्य समजतो.माझ्या जीवनात अनेक थोर महान संत आले.त्यांच्या आशिर्वादाने अमृत महोत्सव साजरा करण्याचा योग आला. जीवनातील आयुष्य चांगले लाभले,हे माझे परमभाग्य समजतो.यानिमित्त विविध आजारावर रोग निदान व उपचार भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.डॉ.अनिल भानुदास सानप यांच्या मार्गदर्शनात जीवन ज्योत हॉस्पिटल यांच्या सहकार्याने नामांकित डॉक्टरांच्या सहभागाने ४११ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करून औषध गोळ्या देण्यात आल्या. या शिबिरात लाभार्थींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन शिबिराचा लाभ घेतला.याप्रसंगी सत्यसेन मिसाळ यांनी गो.गो.मिसाळ सरांच्या आप्तेष्ट नातेवाईकांची,कौटुंबिक नाते संबंधाची ओळख करून दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.अनिल सानप यांनी केले.या कार्यक्रमाला माजी आ.साहेबराव दरेकर,माजी आ.राजेंद्र जगताप,माजी आ.भाई जनार्दन तुपे,संपादक अजित वरपे,संपादक सुनील क्षीरसागर सह भिमराव आखाडे तसेच सत्यभामा बांगर,विठ्ठल सानप,सुशीलाताई मोराळे,विजय गोल्हार,माधवराव मोराळे,युवा नेते जयदत्त धस,सतीश शिंदे,माऊली आप्पा जरांगे,रामदास बडे ,नगरसेवक गणेश तांदळे,भाऊसाहेब भवर,प्रकाश सुसकर,सीए लड्डा,शिक्षणअधिकारी काकडे,हळवे,स्वप्निल कोटेचा,चंद्रकांत फड,अभय कोटेचा,राजेंद्र मुनोत,आदेश लोळगे,अमर जाधव,अशोक धांडे,नारायण शेठ,विश्वनाथ भोपळे,रमेश मुंढे,आनंद लाड,कराळे साहेब,ज्ञानेश्वर कुलकर्णी,हनुमंत सानप,माऊली सानप,भगवान खाडे सर,उद्धव शेठ पवार,अमोल तरटे,महेश आजबे,महादेव घुले,अर्जुन आबा पवार,पांडुरंग नागरगोजे, विष्णुपंत जायभाये,संजय सानप, गणेश सानप,श्रीमंत सानप,प्रविण पवार,गोटूशेठ संचेती,महेश बुद्धदेव,जालींदर नेमाने,राजेंद्र धोंडे,भा.वा.सानप प्रा.विद्यालय बीड,छत्रपती शाहू महाराज प्रा.विद्यालय बीड,भगवान विद्यालय बीड,जवाहर माध्य व उच्च मा.विद्यालय निरगुडी,हनुमान विद्यालय पांगरी या सर्व शाळांचे मुख्याध्यापक,पर्यवेक्षक,अधिकारी व कर्मचारी वृंद तसेच धार्मिक, राजकीय,सामाजिक,शैक्षणिक, डॉक्टर,वकील,व्यापारी,इंजिनिअर सह सर्व क्षेत्रातील तसेच आजी माजी सरपंच,उपसरपंच,ग्रा.पं.सदस्य, चेअरमन,विविध पक्षाचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी,पत्रकार,मिसाळ परिवारांचे सर्व नातेवाईक विविध भागातून तसेच अंमळनेर,पिंपळवंडी, कोतन,(आठेगाव पुठ्ठा) व सर्व सर्कल मधील महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमानंतर सर्वांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डोळे सर यांनी तर आभार सत्यसेन मिसाळ यांनी व्यक्त केले.कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक वृंद व एल.जी.मिसाळ पेट्रोल पंपाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.गो.गो.मिसाळ सरांच्या जीवनावरील माझ्या पाऊल खुणा या पुस्तकातून व जीवनावरील चित्रफीत मध्ये गो.गो. मिसाळ सरांच्या बालपणापासून ते त्यांनी त्यांच्या जीवनात आजपर्यंत केलेल्या धार्मिक,शैक्षणिक,राजकीय, कृषी,सामाजिक कार्याची व कौटुंबिक जीवनाचे सविस्तर लिखाण करून पाऊलखुणांना उजाळा दिला आहे.

### बार्शी नाका भागात आ.संदीप क्षीरसागर यांच्या कॉर्नर सभेत

ठरला आहे. एकता, विकास आणि संघटित तयारी या तिन्हींचा संदेश या सभेतून देण्यात आला. संदीप क्षीरसागर

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी



### भगवान विद्यालयात चाचा नेहरू यांची जयंती बालदिन म्हणून उत्साहात साजरी

बीड दि १४ (प्रतिनिधी)- शहरातील भगवान विद्यालयांमध्ये देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती बालदिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अंकुशराव आघाव सर, उपमुख्याध्यापक गर्जे सर, पर्यवेक्षक श्री ढोकर सर, डोळे सर व ठोसर सर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. बालदिनाच्या औचित्य साधून ठोसर सर यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांचे जीवनकार्य मनोगतातून व्यक्त केले.जागतिक मधुमेह दिनाचे महत्त्व व पंडित जवाहरलाल नेहरूंचे कार्य शाळेचे मुख्याध्यापक आघाव सर यांनी मार्गदर्शनातून व्यक्त केले.

## डोक्यावर नऊ गुन्हे असलेल्या आरोपी सुधीर वाघमारेवर हद्दपारच्या कारवाईकडे शिवाजीनगर पोलिसांचे दुर्लक्ष

### हनुमान वाघमारे यांची निवेदनातून पोलीस अधीक्षकांकडे तक्रार

बीड दि १४(प्रतिनिधी)-बीड शहरातील आरोपी सुधीर हनुमान वाघमारे उर्फ मिन्नी हा उपविभागीय अधिकारी बीड यांनी हद्पार केला असून देखील शिवाजीनगर पोलीस स्टेशन त्याच्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करत नसून ते दुरलक्षित करित असल्याची तक्रार ३ नोव्हेंबर रोजी हनुमान चंद्रभान वाघमारे राहणारे इंद्र धर नगर बीड यांनी पोलीस अधीक्षक, व जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. जिल्ह्यामध्ये वाळू माफिया गुटखा माफिया तसेच बेकायदेशीर दारू विक्रेते आणि गुंड प्रवृत्तीच्या लोकाविरुद्ध पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून हद्दपारीसह कित्येक जनाची हर्सूल करागृहात रवानगी करत पोलीस प्रशासनाने चांगलाच बडगा दाखवलेला असल्याने असे गुन्हेगार प्रवृत्तीचे लोक तळ्यावर येऊ लागले. मग शहरातील काही विशिष्ट भागात दहशत निर्माण करून सर्वसामान्य लोकांना आपली जरब बसवणा-या या आरोपी विरोधात हद्दपारचे कारवाई अमलात आणण्यासाठी शिवाजीनगर पोलीस का धाडस करत नाहीत असा सवाल देखील आता नागरिकांमधून होऊ लागला आहे.

या संदर्भात हनुमान चंद्रभान वाघमारे यांनी पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की,

, आरोपीवर गंभीर स्वरुपाचे अनेक गुन्हे असून त्यांच्यावर या अगोदर एम.पी.डि.ए. अंतर्गत सन २०२३ मध्ये कारवाई झाली होती. तो हार्सुल कारगृहामध्ये ६ महिने शिक्षा भोगुन ते जेल मधुन सुटून आलेला होता. जेलमधुन आल्या नंतर त्यांच्या वर्तुनकीमध्ये चांगल्या प्रकारे बदल होईल असे वाटले होते. परंतु तसे न होता तो जास्तच अनेक प्रकारचे गंभीर गुन्हे करत राहीला. म्हणुन पोलीस स्टेनल शिवाजीनगर बीड यांना त्याला हदपार करणे बाबतचा प्रस्ताव उपभिागीय अधिकारी बीड यांच्याकडे पाठवला त्या अनुषंगाने त्याला दि. ०३ नोव्हेंबर२०२५ रोजी हद्दपार केले असून तो सध्या सम्राट चौक शाहुनगर, विश्व विठ्ठल अपार्टमेंट सौभाग्य लॉन्स जवळ, पांगरी रोड, अंबिका चौक आदि ठिकाणी दरदिवस दुकानदार व्यापारी यांना त्रास देणे, सर्व सामान्य महिला मुलीची छेड काढणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे असे त्याचे प्रकार राजरोसपणे दर दिवस चालु असून त्यांची परिसरामध्ये दहशत असल्यामुळे असल्यामुळे त्यांच्या विरोधात तक्रार देण्यास कोणी पुढे येत नाही. तरी हद्दपार केलेल्या सुधीर वाघमारे उर्फ मिनी या आरोपीचा तात्काळ बंदोबदस्त करुन कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी. यांनी पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनातून हनुमान चंद्रभान वाघमारे रा. चंद्रधर नगर, बीड ता.जि.बीड मो. ८८८८३५०८४४ यांनी केली आहे. सदर मागणी करण्याबरोबरच सुधीर वाघमारे वर कोणते अनेक अशा प्रकारचे गुन्हे आहेत हे देखील नमूद केले आहे यात पोलीस ठाणे१) शिवाजीनगर बीड, गु.र.नं ३४१/२०२२ कलम ३२३,५०४,५०६,३४ भादवी सह कलम ३ (१), ३(२) (तर) सह कलम ४/२५ भाहका हा गुन्हा असून तो सध्या कोर्ट प्रलंबीत आहे. २) शिवाजीनगर ठाणे बीड येथे १५१/२०२२ ,४५२,३३६, ३२३,४२७, ५०४,५०६ भादवी, प्रमाणे असलेला गुन्हा तो देखील कोर्ट प्रलंबीत आहे.३) शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुरनं ७०/२०२२, ३२४, ३२३, ४२७, ५०४, ५०६ भादवी हा देखील गुन्हा कोर्ट प्रलंबीत आहे. ४) शिवाजीनगर बीड येथे गुरनं ३५८/२०२२, ३५४ (ड),३८६,४२७,५०४,५०६ हा पण भादवी गून्हा

कोर्ट प्रलंबीत आहे. ५) शिवाजीनगर बीड. गूरनं १५९/२०२१,३२४,३२३,५०४,५०६,३४ भादवी हा ही कोर्ट प्रलंबीत आहे.६) शिवाजीनगर बीड गुरनं १६३/२०२४, ३२७, ३२३, ५०४, ५०६ भादवी हा पण कोर्ट प्रलंबीत आहे .७) शिवाजीनगर बीड, गुरनं. ७३/२०२३, ३४१, ३२३,५०४,५०६ भादवी कोर्ट प्रलंबीत आहे. याशिवाय ८) शिवाजीनगर बीड गुरनं ५६२/२०२२, ३/२५ भाहका सह कलम १३५ मपोका कोर्ट प्रलंबीत आहे आरोपी सुधीर वाघमारे याच्यावर एकट्या शिवाजीनगर मध्ये नऊ गुन्हे नोंद असताना व हे सर्व गुन्हे न्यायालयात प्रलंबित असताना या आरोपीला कसलाही धाक राहिलेला नाही. त्याने शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये चांगलीच दहशत बसवलेली आहे असे नमूद करून सदर वरील सर्व गुणांची माहिती व गुन्हे केल्याची पद्धती पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून नमूद केली आहे. तेव्हा सदरील आरोपींना हद्दपार करण्यासाठी शिवाजीनगर पोलीस का धाडस करीत नाहीत असा सवाल करून या संदर्भात सदर आरोपीवर त्वरित हद्दपारची कारवाई अंमलबजावणीत आणावी असे मागणे हनुमान चंद्रभान वाघमारे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनातून केली आहे.

### पोलीस पाटलांनी पदाची प्रतिष्ठा वाढवावी-राज्याध्यक्ष नागरगोजे

#### ३५० नवनियुक्त पोलीस पाटलांचा सत्कार

बीड दि.१४ (प्रतिनिधी)- पूर्वी दहावी पास उमेदवारांना धरून आणत पोलीस पाटील करावे लागत होते. आता तशी परिस्थिती राहिली नाही. केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा दिलेले उच्च विद्याविभूषित तरूण पोलीस पाटील भरतीत पात्र ठरले आहेत. पदाचा मीपणा, गर्व न बाळगता घरची श्रीमंती बाजूला ठेवून निर्व्यसनी, चारित्र्यवान राहावे. सर्व गावकऱ्यांचा विश्वास संपादन करून पदाचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील असोसिएशन संघटनेचे राज्याध्यक्ष महादेवराव नागरगोजे पाटील यांनी केले. मराठा सेवा संघ कार्यालयाच्या भाऊसाहेब देशमुख सभागृहात गुरूवारी दि १३ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील असोसिएशनच्या वतीने जालना जिल्ह्यातील नवनियुक्त पोलीस पाटलांच्या सत्कार सोहळ्यात तेबोलत होते. यावेळी राज्य उपाध्यक्ष डॉ.रवींद्र डोईफोडे, जिल्हाध्यक्ष अर्जुन ढगे पाटील, कार्यकारी अध्यक्ष बबन डोळस, जिल्हा उपाध्यक्ष कैलास गुंजाळ , जिल्हा कोषाध्यक्ष रामचंद्र वाघमारे, महिला उपाध्यक्ष इंदुमती झरेकर , प्रदीप राजे जाधव, कैलास खंदारे पाटील, रमेश वायाळ पाटील, सोपान दहातोंडे, ज्ञानेश्वर मेटकर, संभाजी ढवळे पाटील, गणेश गिरी, यांची प्रमुख उपस्थिती होती. महादेव नागरगोजे पाटील यांनी ३०० रुपयांपासून ते १५ हजार रुपये मानधन मिळण्यासाठी शासन दरबारी संघर्ष, पाठपुरावा याची सविस्तर माहिती दिली. यापुढे शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे पोलीस पाटलांना १५ हजारावरून २१ हजार रुपये मानधन मिळावे, निवृत्तीनंतर पेन्शन किंवा २० लाख रुपये मदत म्हणून शासनाकडून दिले जावेत. निवृत्तीची वयोमर्यादा ६० वरून ६५ पर्यंत करावी यासाठी आपण संघर्ष करणार असल्याचे सांगून उच्चशिक्षित युवकांनी राज्याचे नेतृत्व करण्यासाठी पुढे यावे असे आवाहनही नागरगोजे पाटील यांनी केले. सुरुवातीस जिल्हाध्यक्ष अर्जुन ढगे पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ.रवींद्र डोईफोडे, बबन डोळस यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन आशिष रसाळ यांनी केले तर प्रदीप राजे जाधव यांनी आभार मानले.

### कुंबेफळ येथील जि.प.उच्च प्राथ.शाळेत सी.व्ही.रमण व मेरी क्युरी जयंती साजरी

केज दि १४(प्रतिनिधी)- तालुक्यातील कुंबेफळ येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत सी व्ही रमण व मेरी क्युरी यांची जयंती ७ नोव्हेंबर रोजी साजरी करण्यात आली यावेळी सरुवातीस मुख्याध्यापक व शिक्षकांनी सी.व्ही.रमण व मादाम मेरी क्युरी यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले. यावेळीशाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक राजाभाऊ कदम यांनी सी व्ही रमन यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला .तर मादाम मेरी क्युरी या पोलिश वंशाच्या फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ आणि रसायनशास्त्रज्ञ होत्या. त्यांचा जन्म दि.७ नोव्हेंबर १८६७रोजी झाला.त्या रेडिओ अक्टिव्हिटीवरील (किरणोत्सर्गी)कामासाठी प्रसिद्ध आहेत.त्यांनी दोनदा नोबेल पारितोषिक जिंकले आणि फ्रान्समध्ये डॉक्टर ऑफ सायन्स पदवी मिळविणारीपहिली महिला होत्या.त्यांनी किरणोत्सर्गी संस्थानिकांचे पृथक्करण करण्यासाठी तंत्रांचा शोध लावला. अशी माहिती दिली.या शाळेतील प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ.मुळे रामकिशन व संदीपठोंबरे, शिक्षक आकाश लोंढे, श्री.राहुल बचुटे, श्री.आबासाहेब धपाटे, शिक्षिका श्रीमती भोरे निलावती मॅडम,श्रीमती उटीकर अंजली, ट्रेनी शिक्षिका काळे रोहिणी, शापोआ.कामगार सुवर्णमाला पवार यांनी सखोल माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राहुल बचुटे यांनी केले व आभार संदीप ठोंबरे सर यांनी मानले.

### केज खरेदी-विक्री संघात सोयाबीन, उडीद व मुगाची ऑनलाईन नोंदणी करावी -बालासाहेब बोराडे

केज दि १४ (प्रतिनिधी)- केज तालुका खरेदी-विक्री संघास नाफेड अंतर्गत आधारभूत किमतीने सोयाबीन, उडीद व मूग खरेदी योजना २०२५ - २०२६ सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे. या खरेदी केंद्रांतर्गत शेतकऱ्यांचे सोयाबीन, उडीद व मूग या पिकांची शासकीय हमीभावाने खरेदी होणार आहे. याची ऑनलाईन नोंदणीप्रक्रिया खरेदी विक्री संघाच्या कार्यालयात सुरु करण्यात आल्याची माहिती चेअरमन बालासाहेब बोराडे यांनी दिली आहे.प्रतिवर्षा प्रमाणे याहीवर्षी शासनाने हमीभावाप्रमाणे खरेदी केंद्र सुरु करण्यास परवानगी दिली आहे. या शासकीय खरेदी केंद्रावर सोयाबीनला ५३२८ रुपये मूग ७८०० रुपये तर उडीद ८७६८ रुपये प्रति क्विंटल हा हमीभाव निश्चित करण्यात आला आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी ७/१२, ८ अ उतारा (ई पीकपाहणीसह), आधारकार्ड, बँक पासबुक घेऊन संबंधित शेतकरी बांधवाने नोंदणीसाठी उपस्थित राहणे बंधनकारक व अनिवार्य आहे. नोंदणीची अंतिम तारीख ३१ डिसेंबर असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.तसेच प्रत्यक्ष खरेदी १५ नोव्हेंबर पासून सुरुहोणार असल्याने जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी नोंदणी करून घ्यावी असे आवाहन चेअरमन बालासाहेब बोराडे, व्हाईस चेअरमन दत्तात्रय (पिंटु) ठोंबरे यांच्यासह सर्व संचालक मंडळाने केले आहे.

## गो.गो. मिसाळ सरांच्या अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्त अंमळनेर येथे आरोग्य शिबिर संपन्न

बीड दि १४ (प्रतिनिधी)-पाटोदा तालुक्यातील अंमळनेर गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य गो.गो. मिसाळ सर यांचा गुरुवार १३ नोव्हेंबर २०२५ रोजी अंमळनेर येथे भव्य दिव्य अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा (७५ वा वाढदिवस) उत्साहात संपन्न झाला. यावेळी पाटोदा तालुक्यातील अमळनेर येथे मोफत आरोग्य शिबीर संपन्न झाले. याप्रसंगी आप्तेष्ट व सर्व नातेवाईक यांच्याकडून गो.गो. मिसाळ सर यांचे पाद्यपूजन व ७५ दीप प्रज्वलनाने औक्षण करून त्यांच्या जीवनावर आधारित जीवनचरित्र चित्रफित दाखविण्यात आली. श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत गुरुवर्य न्यायाचार्य डॉक्टर नामदेव शास्त्री महाराज यांच्या शुभहस्ते गो.गो. मिसाळ सर यांच्या जीवनावरील माझ्या पाऊलखुणा या आत्मचरित्राचे प्रकाशन संपन्न झाले.यावेळी अंमळनेर येथील भारत पेट्रोल पंपाजवळील हॉटेल राजधानी या ठिकाणी भव्य मोफत आरोग्य शिबिरात तपासणी व उपचार शिबिर घेण्यात आले याचा अंमळनेर, पिंपळवंडी, कोतन आठेगाव पुठ्ठा या सर्कल मधील सर्व तमाम जनतेने लाभ घेतला. अभिष्टचिंतन सोहळा व इतर सर्व कार्यक्रमाचे नियोजन डॉक्टर अनिलकुमार सानप , सचिव भगवान विद्या प्रसारक मंडळ बीड, सत्यसेन गोपाळराव मिसाळ सचिव भगवानगड शिक्षण प्रसारक मंडळ बीड व डॉक्टर चित्रसेन गोपाळराव मिसाळ सहसचिव भगवानगड शिक्षण प्रसारक मंडळ बीड तसेच सर्व मिसाळ परिवार यांनी केले होते.

### केवड येथे मनोज जरांगे पाटील यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक




चिंचोली माळी दि १४ (प्रतिनिधी)- येथुन जवळच असलेल्या व केज तालुक्यातील मौजे केवड येथे संघर्ष युद्धे मनोज रंगे पाटील यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून त्यांच्या नावाचा जयघोष करण्यात आला.संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचण्यात आला होता. त्यानंतर जरांगे पाटील यांनी नार्को टेस्ट करण्यासाठी अर्ज देखील केला आहे. तसेच मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे की, नार्को टेस्ट मध्ये काय दुध का दुध पाणी का पाणी एकदा कळेलच. यात सहा कोटी मराठा समाज संघर्ष योध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांना देव मानत आहेत. व त्यांना जिवे मारण्याचा कट रचणे म्हणजे सहा कोटी मराठा समाजाला मारल्यासारखे आहे व तसेच परळी तालुक्यात धनंजय मुंडे समर्थका कडुन संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या प्रतिमेची विटंबना केली त्यांचा निषेध व्यक्त करत घोषणाबाजी करत संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील चौक केवड येथे मनोजदादा जरांगे पाटील यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करण्यात आला आहे.यावेळी केज तालुक्यातील चिंचोली माळी, केवड, वरपगाव, प्रींप्री, काळेगाव घाट येथील सकल मराठा समाज बांधव उपस्थित होते.

### नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शितलताई दाभाडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादीच्या महिला रणरागिणीं सरसावल्या

गेवराई दि.१४ (प्रतिनिधी) -- गेवराई नगराध्यक्ष पदासाठी सौ.शितलताई महेश दाभाडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला आघाडीच्या महिला रणरागिणी सरसावल्या. या महिलांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी आ.अमरसिंह पंडित व आ.विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण शहरात रॅली काढून संपर्क करण्यावर भर दिला आहे.



यावेळी यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला आघाडीच्या विधानसभाक्षेत्र अध्यक्ष सौ.मुक्ताताई आर्दड-मोटे म्हणाल्या की, १० वर्षे आमदार असताना लोकांची अवहेलना करणारे व लोकांनाच माझी गरज आहे असे म्हणणारे आता परत मते मागायला लागले आहेत. नगरपरिषद निवडणूकीत माजी आ. अमरसिंह पंडित व आ.विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष पदासहीत सर्व नगरसेवक निवडून देऊन शहराच्या विकासाची संधी द्यावी असे आवाहन त्यांनी केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला आघाडीच्या पल्लवी गोगुले, योगिता तांबारे, किरण दाभाडे, शीला पैठणे, अनिता काळे, निता बेदरे, संगीता घोडके, प्रिती दाभाडे, सीमा होंडे, सीमा जवंजाळ, प्रणिता रूकर यांच्यासह शेकडो महिला सहभागी झाल्या होत्या.

### बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बाल दिन साजरा

बीड दि.१४ प्रतिनिधी-बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आज दिनांक १४. नोव्हेंबर २०२५ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान व आधुनिक भारताचे शिल्पकार जवाहरलाल नेहरू यांची जयंती बालदिन म्हणून साजरी करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती देशभर बालदिन साजरा करण्यात येतो. विद्यालयाचे प्राचार्य श्री राजकुमार कदम यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानीविद्यालयाचे ज्येष्ठ प्रा. श्री सोंडगे बी. बी. होते तर मंचावर ज्येष्ठ प्रा. श्री कदम एस. एस. , ज्येष्ठ शिक्षक श्री कदम बी. एस., व वरिष्ठ लिपिक श्री सुधीर पायाळ यांची प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात पंडीत नेहरू यांच्या प्रतिमा पूजनाने व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. या प्रसंगी बोलताना प्राचार्य श्री राजकुमार कदम यांनी पंडीत नेहरू यांच्या जीवनकार्याचा विस्तृत आलेख सर्वांसमोर मांडला. यावेळी त्यांनी पंडित नेहरू यांच्या आधुनिक भारताच्या उभारणीत दिलेल्या योगदानाचे महत्त्व विषद करताना विज्ञानाभिमुख होण्याचे आवाहन केले. तर श्रीम गणगे व्ही. एम. व सोंडगे बी. बी. यांनी पंडीत नेहरू ते चाचा नेहरू या प्रवासाची महती सांगितली. कार्यक्रमाचे संचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख घाटे ए. एस. यांनी केले तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक चौरे व्ही. एस. यांनी केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. पंडीत नेहरू यांना सामूहिक अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### ॲड.इतेश चव्हाण यांना पितृशोक

शिरूर कासार दि १४ (प्रतिनिधी)- शिरूर कासार येथील ॲड.इतेश



चव्हाण यांचे वडील कै.जिजाबा गजाबा चव्हाण सेवानिवृत्त शिक्षक वयाच्या ८१ वर्षी वृद्धपकाळाने आजारी असल्याने निधन झाले त्यांचा अंत्यविधी १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता शिरूर कासार अमरधाम या ठिकाणी करण्यात आला.यांच्या पाश्चात दोन मुले एक मुलगी पत्नी नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### श्रीमती कंचनबाई चोपडा यांचे संथारा व्रतात निधन

जामखेड दि १४(प्रतिनिधी)- लोकेश चोपडा यांच्या मातोश्री श्रीमती कंचन बाई अरविंद चोपडा यांचा पुणे येथे संथारा पूर्णाहुती झाला, त्या ७१ वर्षे वयाच्या



होत्या. गुरुवार दि. १३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी परमपूज्य गुरुदेव आशिषमुनीजी म.सा. यांच्या मुखारवृंदाने त्यांनी संथारा ग्रहण केला होता. मध्यरात्री संथार्याची पूर्णाहुती झाली आहे. त्या धार्मिक आणि दानशूर होत्या त्यांच्या मागे मुलगा लोकेश आणि नातू मानव, साहिल असा परिवार आहे .श्रीमती कांचन बाई ह्या आष्टापूर (पुणा) येथील कुंकूळोळ परिवारातील होत्या त्यांची शोभायात्रा शुक्रवार दि. १४नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या निवासस्थान बोरा पॅराडाईज ,बिबवेवाडी रोड, लकी बेकरी च्या मागे पुणे वरून निघून नवी पेठ वैकुंठ येथे जाईल तिथे त्यांच्यावर अग्निसंस्कार होतील.जामखेड येथील सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी, कांतीलाल कोठारी, मनोज दुगड, राहुल राखेचा, आदिनाथ ग्रुप यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

### नामदेवराव शिंदे यांचा अमृत महोत्सवी सत्कार

बीड दि.१४ (प्रतिनिधी)-सेवानिवृत्त बँक कॅशियर नामदेवराव शिंदे यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस बीड येथे त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने बुधवार दि. १३ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात आला.यावेळी उपस्थित चव्हाण यांनी शिंदे यांना शुभेच्छा देताना, नामदेव शिंदे हे हैदराबाद बँकेतील सेवानिवृत्त बँक कर्मचारी असून त्यांनी आपल्या सेवाकाला अत्यंत प्रामाणिक इमानदारीने आणि कार्यतत्पर कर्मचारी म्हणून कर्तव्य बजावले. शौन्यवृत्तीनंतरही ते अनेक सामाजिक उपक्रमात सहभागी घेत आहेत. परोपकार, सेवा भावीवृत्ती आणि सज्जन व्यक्तिगत व्यक्तिमत्व म्हणून ते सुप्रीत आहेत. समाजातील सर्व स्तरातील लोकांच्या सुखदुःखात सहभागी होऊन ते सातत्याने अनेकांना मदत करतात. सदाबहार प्रसन्न आणि चंचल व्यक्तिमत्व असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे, असे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. यावेळी नगरपालिकेचे माजी सभापती भास्कर जाधव, सेवानिवृत्त मंडळ अधिकारी रामनाथ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी मुंडे, डॉ. शिवाजी चव्हाण, रमेश शिंदे,विलास गव्हाणे, विठ्ठल तिपाले, ठाकूर, पत्रकार नारायण नागरे आदींची उपस्थिती होती.

### कु.अश्विनी दहीभातेच महाविद्यालयात झालं कौतुक

केज दि १४ (प्रतिनिधी)- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर द्वारा आयोजित जिल्हा स्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाची बी.एस्सी.तृतीय वर्षात शिकणारी विद्यार्थिनी कु. दहिभाते अश्विनी महादेव हिचा प्रथम आल्याने तिची सेंट्रल झोन साठी निवड झाली आहे. अश्विनी दहीभाते च्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव रमेशराव आडसकर,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजी नगर च्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या अर्चनाताई आडसकर,प्राचार्य डॉ. माधवराव फावडे, अधिक्षकपी.एस. भोसले,डी.एस.यादव यांनी अभिनंदन केले आहे.बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाच्या वतीने अश्विनी दहीभाते व तिचे पालक यांचा सत्कार प्राचार्य डॉ.माधवराव फावडे यांनी केला.या प्रसंगी डी.एस.यादव, डॉ.सचिन शिंदे,डॉ.सौ. रतन गंगणेडॉ.अनिल गायकवाड,डॉ.काळम, डॉ.सरसरे व महाविद्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

### बीड नगराध्यक्ष पदासाठी दिव्या स्वामी यांचा पहिला उमेदवारी अर्ज दाखल



बीड दि १४ (प्रतिनिधी)- बीड नगराध्यक्ष पद अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव झाले आहे. यात उच्चशिक्षित एमएससी ॲग्री झालेल्या तरुण अविवाहित व केज मतदार संघाचे भूतपूर्व आमदार ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक कै. रामलिंग स्वामी यांची नात कु. दिव्या महेश स्वामी यांनी बीड नगराध्यक्ष पदासाठी पहिला अर्ज दाखल केला आहे.

बीड नगरपालिकेच्या निवडणूक कक्षामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांच्याकडे बीड नगराध्यक्ष पदासाठी नामनिर्देशन पत्र अनुक्रमांक १ नुसार १३ नोव्हेंबर रोजी दाखल केले आहे. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची उपस्थिती होती. उमेदवारांच्या अर्जाची छाननी १८ नोव्हेंबर रोजी होणार आहे.बीड नगराध्यक्ष पदासाठी अतिशय सामान्य कुटुंबातील उच्च शिक्षित तरुण असलेल्या दिव्या महेश स्वामी यांनी समाजाच्या आग्रहास्तव उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तिच्या उमेदवारीमुळे वीरशैव लिंगायत समाजासह सर्वसामान्य मतदारांमधून उस्फूर्तपणे स्वागत होत आहे. उमेदवार दिव्याचे आजोबा ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक केज मतदार संघाचे पहिले आमदार कै. रामलिंग स्वामी हे होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेशाबद्दल संदीप जाधव सत्कारित

बीड दि १४ (प्रतिनिधी):-बीड विधानसभेचे अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत आणि ॲड.महेश धांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यकर्ते संदीप जाधव यांनी कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षात प्रवेश केला. यावेळी योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे भव्य स्वागत केले.

संदीप जाधव हे बीड शहरात विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय असून त्यांनी रक्तदान शिबिरे, गरजू रुग्णांना मदत, महापुरुषांच्या जयंती उत्सवांचे आयोजन यांसारखी उल्लेखनीय कामे केली आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याचा पक्षाला नक्कीच फायदा होणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.यावेळी डॉ. योगेश क्षीरसागर म्हणाले की, संदीप जाधव यांच्या कार्याचा योग्य गौरव करून पक्ष त्यांना पुरेशी संधी देईल.या पक्षप्रवेशामध्ये मोठ्या संख्येने युवक आणि कार्यकर्त्यांनीही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला असून त्यामुळे बीड शहरातील पक्षाची ताकद अधिक बळकट झाल्याचे स्पष्ट झाले आहे.



# संपादकीय

## डिजिटल अरेस्ट सायबर गुन्ह्याच्या नवा फंडा

पूर्वी दरोडेखोर घरांवर दरोडा टाकून घरातील मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम लुबाडून नेत असत पण आज काळ बदलला आजचे युग हे डिजिटल युग आहे आणि या डिजिटल युगात दरोड्याची पद्धतही बदलली. दरोडेखोरही डिजिटल झाले आणि दरोड्याची पद्धत डिजिटल झाली. आज दरोडेखोर तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांची लुबाडणूक करतात त्यालाच सायबर गुन्हा असे म्हणतात. सायबर गुन्हेगार नागरिकांना तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना लुबाडण्याचा नवा नवा फंडा शोधत असतात कधी ते क्रेडिट कार्डची माहिती विचारून तर कधी बँक खात्याची माहिती विचारून अवघ्या काही सेकंदात नागरिकांचा बँक बॅलन्स शून्य करतात. जेंव्हा खात्यातून पैसे गायब होतात तेंव्हाच नागरिकांना आपली लुबाडणूक झाली हे लक्षात येते मात्र तोवर खूप उशीर झालेला असतो. सायबर गुन्हेगार फसवणूक झालेल्या नागरिकांचा बँक बॅलन्स शून्य करतात बरे हे सायबर गुन्हेगार शोधणे हे पोलिसांसाठीही मोठे जिकिरीचे काम असते कारण हे गुन्हेगार अदृश्य चेहऱ्याचे असतात. हे सायबर गुन्ह्याचे नवेनवे फंडे शोधून काढत असतात असाच 'डिजिटल अरेस्ट' हा नवा फंडा सायबर गुन्हेगारांनी शोधून काढला आहे. सध्या डिजिटल अरेस्टच्या नावे फसवणूक आणि लुटीचा सुळसुळाट सुरू आहे. डिजिटल अरेस्टद्वारे फसवणूक झाल्याचा प्रकार सध्या रोजच घडत आहे. यात सायबर गुन्हेगार जेष्ठ नागरिकांना लक्ष करतात आणि त्यांना डिजिटल अरेस्टची भीती घालून त्यांच्याकडून लाखोंची, करोडोंची लूट करतात. असाच प्रकार काही दिवसांपूर्वी पुण्यात घडला. डिजिटल अरेस्टची भीती दाखवून सायबर गुन्हेगारांनी ८३ वयाच्या निवृत्त सरकारी अधिकाऱ्याला तब्बल १ कोटी २० लाखांना गंडा घातला. याचा प्रचंड मानसिक त्रास झाल्याने त्या व्यक्तीचा मृत्यू झाला. याआधी हरियाणातही एका वृद्ध दांपत्याला अशाच प्रकारे डिजिटल अरेस्टची भीती दाखवून एक कोटी रुपयांना लुबाडले. डिजिटल अरेस्ट करताना सायबर गुन्हेगार श्रीमंत असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना लक्ष करतात. सायबर गुन्हेगार जेष्ठ नागरिकांना व्हिडिओ कॉल करून आपण पोलिस, ईडी, सिआयडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग, लष्करी अधिकारी असल्याची बतावणी करतात. देशविघातक कृत्य, बेकायदेशीर वस्तू, ड्रग्स, बनावट पासपोर्ट, दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे सांगून जेष्ठ नागरिकांना डिजिटल अरेस्ट केल्याचे संगीतात. पीडितांना विश्वास बसावा यासाठी ते न्यायालयाचे बनावट आदेशही पाठवतात. सायबर गुन्हेगार पीडित व्यक्तीला २४ तास त्यांच्या घरातच व्हिडिओ कॉलवर बंदिस्त अर्थात नजर कैदेत ठेवतात. सायबर गुन्हेगार व्हिडिओ कॉलवर कुठल्या तरी पोलिस स्टेशन किंवा सीबीआयच्या कार्यालयातून बोलत असल्याचे भासवतात. त्यामुळे पीडित व्यक्तीला त्यांच्यावर विश्वास बसतो. पीडित व्यक्ती आपण खरेच डिजिटल अरेस्ट झाल्याचे मानतो आणि तुरुंगात जावे लागू नये म्हणून सायबर गुन्हेगार मागतील तेवढी खंडणी त्याला देण्यास तयार होतात. सायबर गुन्हेगार ही खंडणी ऑनलाईन वसूल करतात. अवघ्या काही तासात सायबर गुन्हेगार या जेष्ठ नागरिकांकडून लाखो करोडो रुपये लुबाडतात. सायबर गुन्हेगारांनी डिजिटल अरेस्ट हा नवा फंडा वापरून यावर्षी जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यात तब्बल ११२ कोटी रुपये लुबाडल्याचे समोर आले आहे. या आठ महिन्यात डिजिटल अरेस्टचे तब्बल २०८ गुन्हे नोंदवले गेले आहेत. या आकडेवारी वरुनच याची व्याप्ती किती मोठी आहे हे आपल्या लक्षात येईल. डिजिटल अरेस्टचे गुन्हेगार शोधणे सायबर पोलिसांसाठी मोठी डोकेदुखी बनली आहे कारण हे सर्व गुन्हेगार अदृश्य चेहऱ्याचे असतात आणोबते गुन्हा देखील आभासी पद्धतीने करतात. सायबर गुन्हेगार देशातील कोणत्याही भागातून किंवा अगदी परदेशातूनही हा गुन्हा करतात त्यामुळे त्यांना शोधणे पोलिसांना सहज शक्य होत नाही. सायबर पोलिस या गुन्हेगारांना शोधण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करत असतातच मात्र नागरिकांनीही याबाबत सतर्क राहायला हवे. भारतीय कायद्यात कोठेही डिजिटल अरेस्टला थारा नाही. आपल्या कायद्यानुसार डिजिटल अरेस्टला कोणतीही मान्यता नाही याची नोंद नागरिकांनी घ्यायला हवी. पोलिस किंवा कोणतीही सरकारी यंत्रणा आपल्याला डिजिटल अरेस्ट करू शकत नाही. मात्र हे खूप कमी लोकांना माहीत आहे म्हणूनच याबाबत जनजागृती व्हायला हवी. नागरिकांना विशेषत: ज्येष्ठ नागरिकांना याबाबत माहिती द्यायला हवी. डिजिटल अरेस्ट किंवा एकूणच सायबर गुन्ह्याविषयी शाळा महाविद्यालयात कार्यशाळा, प्रत्यक्षिके, प्रशिक्षणे, जनजागृती कार्यक्रम आणि प्रचार प्रसार करायला हवा. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मिडियातूनही याबाबत जनजागृती व्हायला हवी. नागरिकांनीही याबाबत सतर्क राहायला हवे. नागरिक सतर्क राहिले तरच सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकणार नाही.

# एकलव्य विद्यालयात बालकांनी अनुभवली खरी कमाई

शिरूर कासार दि १४(प्रतिनिधी) - येथील शिरूर कासार येथील एकलव्य विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बालदिनानिमित शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी 'बाल आनंद मेळावा' उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थी, पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने कार्यक्रमाला उत्साहवर्धक वातावरण लाभले. मेळाव्याची सुरुवात भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. विद्यार्थ्यांनी बालदिनाचे महत्त्व सांगत आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिवचरित्रकार कैलास तुपे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यानंतर शाळेच्या प्रांगणात 'बाल आनंद मेळावा' सुरू झाला.

शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वतः विविध वस्तू बनवून त्यांची विक्री करण्याचा अनुभव घेतला. जणू हा बालबाजारच असून व्यावहारिक ज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून मिळाली. मुलांनी तयार केलेल्या वस्तूंची पालकांनी उत्साहाने खरेदी करून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. एकलव्य विद्यालयात वर्षभर अनेक उपक्रम राबवले जातात. त्याच परंपरेचा भाग म्हणून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि व्यावहारिकतेकडे कल वाढावा या उद्देशाने 'बाल आनंद मेळावा' आयोजित करण्यात आला. मेळाव्यात भेळ, पाणीपुरी, अप्पे, कचोरी, भेलपुरी, रगडा, गुलाबजाम, भजी, वडापाव, मसाला पापड, इडली-सांबार, दाल-रोटी यांसह पेरू, बोरं अशा चविष्ट पदार्थांचे स्टॉल विद्यार्थ्यांनी स्वतः चालवले. मुलांनी बनवलेल्या पदार्थांची चव पालकांनी आणि पाहुण्यांनी चाखून कौतुक केले. विक्रीतून झालेल्या कमाईचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. बालदिनानिमित्त मुलांचे व्यक्तिमत्त्व विकास, आनंद, आत्मविश्वास आणि शिकण्याची आवड वाढविणे हा उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे प्राचार्य निलेश पोकळे यांनी सांगितले. मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून हा बाल आनंद मेळावा अविस्मरणीय केला.





वडवणी-शहरातील बीड परळी लहुजी साळवे चौकात हायवेवर क्रांती गुरु वस्ताद लहुजी साळवे यांच्या २३१ व्या जयंतीनिमित्त ध्वजारोहण करून सर्वच समाज बांधव अभिवादन करतांना

# कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी जिद्द महत्त्वाची–रणवीर पंडित



गेवराई दि.१४ (प्रतिनिधी):- कोणत्याही क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी जिद्द महत्त्वाची आहे, मनात जिद्द ठेवून वाटचाल केली तर यश आपल्याकडे येते. तेव्हा विद्यार्थ्यांनी मनात जिद्द ठेवून वाटचाल करावी व यशस्वी व्हावे असे आवाहन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. शिवाजीनगर गढी येथील कॉलेज ऑफ बी.फार्मसी अँड रिसर्च सेंटर येथे विद्यार्थ्यांकरिता फ्रेशर्स दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ बी.फार्मसी अँड रिसर्च सेंटर शिवाजी नगर, गढी येथे प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी फ्रेशर्स दिनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, बाजार समितीचे उपसभापती श्रीराम पवार, शिवशारदा पब्लिक स्कूलचे प्राचार्य संतोषकुमार अन्नम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना रणवीर पंडित म्हणाले की, विद्यार्थ्यांनी वर्तमान काळातील शिक्षण क्षेत्रात असलेल्या स्पर्धेसाठी आवश्यक असलेली जिद्द आत्मसात करून सामोरे जावे. तसेच आज दैनंदिन शिक्षणासह उत्तम आरोग्यासाठी खेळातही सहभाग आवश्यक आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांनी विविध खेळामध्ये सहभागी व्हावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.राख एम.एस., प्रा.बदरे ए.ए., प्रा.देशमुख आर.बी., प्रा.शेख एम.आय., प्रा.गोयकर एम.बी., प्रा.धुमाळ एम.डी., प्रा.देशमुख एस.व्ही, प्रा.गायकवाड व्ही.एस., प्रा.गायकवाड वाय.एम. यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी पवार एस.जी., मोटे जी.आर., शिंदे आर.आर., नाटकर आर.ई., माने वाय.डी., काळे ए.एस., पवार पी.आर., शिंदे पी.बी., मडिकर ओ.एस. यांनी अथक परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लिंबागणेश जिल्हा परिषद शाळेत बालदिन उत्साहात साजरा

लिंबागणेश दि १४ (प्रतिनिधी) - बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १४ नोव्हेंबर रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त प्रभारी केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक दीपक घाटे यांचे अध्यक्षतेखाली बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून हरिओम क्षिरसागर हे उपस्थित होते कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेली पंडित नेहरूंच्या वेशभूषेची नक्कल.




नेहरू टोपी, गुलाब फुल आणि त्यांच्या अद्वितीय शैलीसह लहान मुलांनी केलेल्या भूमिकांनी वातावरण भारावून गेले. यावेळी प्रमुख वक्त्यानी चाचा नेहरू यांच्या जीवन कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितले कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती सुवर्णा अयाचित यांनी केले, तर आभारप्रदर्शन श्रीमती ज्योती सानप यांनी केले.

# गेवराईत सुरेश वादे यांच्या घरी माजीमंत्री पंडित यांचे रांगोळी काढून स्वागत






गेवराई दि.१४ (प्रतिनिधी) :- न.प.निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने गेवराई शहरात सध्या भेटीगाठी घेणे सुरू झाले असून माजीमंत्री बदामराव पंडित यांनी शुक्रवारी सुरेश वादे यांच्या घरी भेट दिली असता त्यांनी आपल्या घरासमोर काढलेल्या रांगोळीत भाजपचे कमळ चिन्ह आणि जय बदाम असे नाव लिहून त्यांचे यथोचित स्वागत करून भव्यदिव्य असा सत्कार केला. अशाप्रकारे केलेले आगळेवेगळे स्वागत पाहून माजीमंत्री बदामराव पंडित यांच्यासह इतर कार्यकर्तेही भारावून गेले होते. माजीमंत्री बदामराव पंडित यांच्यावर निस्वार्थपणे प्रेम करणारे असे अनेक कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिक गेवराई शहरासह तालुकाभरात मोठया प्रमाणावर आहेत. .प.निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने गेवराई शहरात सध्या भेटीगाठी घेणे सुरू झाले असून माजीमंत्री बदामराव पंडित यांनी शुक्रवारी सुरेश वादे यांच्या घरी भेट दिली असता त्यांनी आपल्या घरासमोर काढलेल्या रांगोळीत भाजपचे कमळ चिन्ह आणि जय बदाम असे नाव लिहून त्यांचे यथोचित स्वागत करून भव्यदिव्य असा सत्कार केला. अशाप्रकारे केलेले आगळेवेगळे स्वागत पाहून माजीमंत्री बदामराव पंडित यांच्यासह इतर कार्यकर्तेही भारावून गेले होते. माजीमंत्री बदामराव पंडित यांच्यावर निस्वार्थपणे प्रेम करणारे असे अनेक कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिक गेवराई शहरासह तालुकाभरात मोठया प्रमाणावर आहेत. सुरेश वादे यांनी अशाप्रकारे केलेले हे स्वागत मी कधीही विसरू शकणार नाही असे मत यावेळी बदामराव आबा पंडित यांनी व्यक्त केले. याप्रसंगी कैलास माने, प्रभाकर वादे, सुदाम वादे, वैजीनाथ वादे, ड.प्रताप खेडकर, गणेश जाधव, दिपक चौधरी आदीजण उपस्थित होते.

# राजकिशोर मोदी यांच्या प्रभाग १ व २ मधील नागरिकांच्या घरोघरी जाऊन गाठी भेटी

अंबाजोगाई दि १४ (प्रतिनिधी) - अंबाजोगाई नगर परिषदेची निवडणूक जाहीर झाली असून त्यामध्ये दिवसेंदिवस निवडणूकित रंग भरत असल्याचे दिसून येऊ लागले आहे. याच अंबाजोगाई नगर परिषदेच्या रणधुमाळीत नगराध्यक्ष पदाचे प्रमुख उमेदवार राजकिशोर मोदी यांनी त्या त्या प्रभागातील आपल्या सहकारी उमेदवारांना घेऊन प्रभागातील मतदारांच्या प्रत्यक्ष घरोघरी जाऊन त्यांच्या गाठीभेटी घेत प्रचाराचा श्रीगणेशा केला आहे. गुरुवार दि.१३ रोजी प्रभाग क्र.१ मधून मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेत प्रचाराचा शुभारंभ केला. शुक्रवार दि.१४ रोजी प्रभाग क्रमांक २ मधील सर्व मतदारांना सहकार्य करण्याची व मतदान रुपी आशिर्वाद देण्याची साद राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकारी उमेदवारांनी दिली. याप्रसंगी राजकिशोर मोदी यांच्या समवेत प्रभाग क्रमांक १ मधील प्रमुख उमेदवार संकेत राजकिशोर मोदी व हाजी शेख व त्या प्रभागातील अनेक सहकारी उपस्थित होते. तर प्रभाग क्रमांक २ मध्ये तेथील प्रमुख उमेदवार अंकुश हेडे व मणियार व त्या प्रभागातील प्रमुख सहकारी हे सहभागी होते. प्रभागातील या भेटी दरम्यान राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांचे मतदारांच्या कडून उत्स्फूर्तपणे स्वागत केल्या जात होते.

# शिरूर कासार तालुक्यात वंचित बहुजन आघाडीचे ताकद–दिलीप माने

शिरूर कासार दि.१४ (प्रतिनिधी)- वंचित बहुजन आघाडी अनेक वर्षापासून शिरूर या ठिकाणी सक्रिय काम करत आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न असतील दिन दलितांचे उपेक्षितांचे प्रश्न असतील हे शासन दरबारी पोहोच करण्याचं काम त्यांनी केले आहे. शेतकऱ्यांना वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांची आक्रमक भूमिका पाहायला मिळाली. त्यांच्या याच आक्रमक भूमिकेमुळे सर्वांनाच वंचित बहुजन आघाडी ही न्याय मिळवून देणारी आहे आणि त्या ठिकाणी आपल्याला न्याय मिळू शकतो या आशेने त्यांच्याकडे पाहिलं जातं. निवडणुकीतही त्यांना शेतकरी, वंचित, उपेक्षित अपेक्षित असं सहकार्य करतील हेच अपेक्षा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतवंचित बहुजन आघाडी सध्या तरी स्वबळावर निवडणूक लढण्याच्या तयारीत आहे. आज पर्यंत केलेले आंदोलन त्यातून मिळालेले यश हे वंचित बहुजन आघाडीचा शस्त्र आहे.

अनेक वर्षांपासून बाळासाहेब आंबेडकर हे जनतेच्या न्याय हक्कासाठी संविधानिक पद्धतीने लढा देत आहे त्यांनी बंचित बहुजन आघाडीची स्थापना करून पक्ष देखील जनतेच्या सेवेसाठी उभा केला आणि जनतेला त्यांच्या हक्काचं मिळून देण्यासाठी मोठी चळवळ उभा केली आहे ती चळवळ शिरूर तालुक्यामध्ये मोठ्या व्यापली आहे आणित्यश्फायदा सर्वसामान्य जनतेला होत आहे. तुमचा पक्ष आणि आमचा नेता तसं आमचंही कार्य आम्ही जनतेसाठी समर्पित केला आहे येणाऱ्या काळात जनता ही आम्हाला आमच्या कामाची पावती देईल ही आम्हाला अपेक्षा आहे. असे दिलिप माने तालुकाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी शिरूर का. यांनी नमूद केले

# द्वा.मंत्री राजस्थानी विद्यालयात बालदिन साजरा

बीड दि.१४(प्रतिनिधी) -येथील द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयात बालदिन व पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री लाहोटी सर तसेच प्रमुख अतिथी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक हावळे सर आणि पर्यवेक्षक मालपाणी सर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते सौ.लखोटिया मॅडम यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. लखोटिया मॅडम यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनाबद्दल विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक व कार्यक्रमाचे अध्यक्ष लाहोटी सर यांनी अध्यक्षीयसमारोप करताना त्यांनी मुलांना असा उपदेश दिला की मुले देशाचे भावी आधारस्तंभ आहेत. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



# मराठवाड्यातील गोड्या पाण्यातील स्थानिक व पारंपारिक मच्छिमारांचे अनुदान वाटप करा–प्रदेशमंत्री अंकुश बलया

## भारतीय मच्छुवारा संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

माजलगाव दि.१४ (प्रतिनिधी)- मराठवाड्यातील गोड्या पाण्यातील स्थानिक व पारंपारिक मच्छीमारांना शासन स्तरावरून शंभर कोटी रूपयांचे अनुदान मंजुर असुन ते अनुदान हे मच्छीमारांना मिळालेले नसुन प्रशासनाकडुन जाणिवपुर्वक मच्छिमारांना वंचित ठेवले जात असल्याचा आरोप करत मच्छिमारांचे सरसकट सर्व्हे करून शासनस्तरावरून अनुदान वाटप करावे अशी मागणीउ भारतीय मच्छुवारा संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशमंत्री अंकुश बलया यांनी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय बीड व जिल्हाधिकारी यांचेमार्फत थेट मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मराठवाड्याती मच्छीमारी सहकारी संस्थेमध्ये वीस टक्के मच्छीमार सभासद असून बिना सभासदांना अद्यापपर्यंत अनेक प्रकारच्या शासकीय योजनेपासुन ८० टक्के मच्छीमार सभासद नसल्यामुळे वंचित रहावे लागत आहे तर काही ठिकाणी मच्छीमारी सहकारी संस्था बरखास्त झाल्या आणि काही संस्था उपलब्ध नाहीत. त्यामध्ये पैठण येथील नाथसागर, माजलगाव, दुधना वाकडी, उजणी, भंडारा, पूर्णा हे धरण तसेच घोड नदी, नाशिक ते नांदेड पर्यंत गोदावरी, भिमा, सिंदफणा, चंद्रभागा नदीच्या किनारीचे स्थानिक व पारंपारिक



मच्छीमार शासनाच्या योजनांपासुन वंचित राहत आहेत. त्यामुळे लाडकी बहिण योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्रातील कहार, भिल्ल, भोई, परदेशी, केवट, मल्वभोई, ढीपर, कश्यप या मच्छिमारांचे शासनस्तरावरून सर्व्हे करा मच्छिमारांचे सरसकट कर्ज माफ करा, अतिवृष्टीने जाळे, पिंजरे, पिळणे, गळ, होडी, चपु यासह विवीध साहित्याचे झालेले नुकसान तात्काळ द्या, स्थानिक काहार, भोई, भिल्ल मच्छीमारांच्या मुलांचे शालेय साहित्य पाण्यात भिजुन नुकसान झालेले आहे. या नुकसान भरपाई पोटी शासनाने शंभर कोटी रूपयांचा मंजुर केलेल निधी मच्छिमारांचे सरसकट सर्व्हे करून त्यांना वाटप करण्यात यावा अशी मागणी निवेदनाव्दारे मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे. निवेदनावर भारतीय मच्छुवारा संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशमंत्री अंकुश बलया, लहु बलया, गणेश बलया, उमेश बलया, कचरू परसे, कमल परसे, शेषेकला बलया, सिता बलया, शारदा बलया, नामदेव घुंगासे, मच्छींद्र घुंगासे, गोरख घुंगासे यांचेसह मच्छिमारांच्या स्वाक्ष-या आहेत.

# सिद्धेश्वर महाविद्यालयाचे जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत सुयश

माजलगाव दि.१४ (प्रतिनिधी) : भाशिप्र संस्थेच्या येथील सिद्धेश्वर महाविद्यालयाचा इयत्ता अकरावी कलेचा विद्यार्थी पठाण रेहान खलंदर खान याने बीड येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय कराटे स्पर्धा प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच या विद्यार्थ्याची विभागीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांस क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उमेश साडेगावकर, प्रा. दिनेश गडदे यांनी मार्गदर्शन केले तर भा.शि.प्र. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र



आलूरकर, उपाध्यक्ष सौ. ज्योती ठाकूर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे, संकुलाचे पालक प्रकाश दुगड, स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, स्थानिक कार्यवाह ऍड. विश्वास जोशी, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्रा, डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक विजय कुलकर्णी यांच्यासह सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्गाने अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# कै.बि.दे.राठी राजस्थानी प्राथमिक विद्यालयात बालदिन उत्साहात साजरा



बीड दि.१४ (प्रतिनिधी) : राजस्थानी सेवा समाज संचलित कै. बि. दे. राठी राजस्थानी प्राथमिक विद्यालय सहयोग नगर, बीड या शाळेत भारताचे माजी पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती तसेच बालदिन उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक महेश पारीख सर, सर्व कर्मचारी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महेश पारीख सर व धारूरकर मॅडम या होत्या. तर प्रमुख पाहुणे तसेच वक्ते म्हणून एकशिंगे सर हे होते. यावेळी प्रमुख वक्ते एकशिंगे सर यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवन कार्याची विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. तसेच डावकर सर यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी समाजात जगण्यासाठी नेहरूजींचे विचार आपल्या जीवनात आणले पाहिजे असे प्रतिपादन केले. तसेच अध्यक्ष समारोपात धारूरकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना नेहरूजींचे कार्य सांगितले. शेवटी विद्यार्थ्यांना बालदिनाचे औचित्य साधून खाऊ वाटप करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. सुयोग डावकर व चि. प्रतीक आरसुळ या विद्यार्थ्यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन विभाग प्रमुख सिकची सर, पंडित सर, राडीकर मॅडम, कुलकर्णी मॅडम, सारडा मॅडम, जोशी मॅडम, उमेश कोठी, रमेश शिंदे, गीता शिंदे यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केले.

# बीडमध्ये दादांच्या राष्ट्रवादीचा नवा अध्याय, युवकांना नेतृत्वाची संधी

## राष्ट्रवादी काँग्रेसकडून जिल्हाउपाध्यक्षपदी नवले, बीड तालुकाध्यक्षपदी घरत तर कार्याध्यक्षपदी शिंदे यांची झाली निवड



बीड (प्रतिनिधी) : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) कडून युवक संघटनांना बळकट करण्याचा निर्धार करण्यात आला असून बीड जिल्ह्यात युवक पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहे. युवकांना नेतृत्वाची संधी देण्यात आली असून युवकच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी जिल्हाउपाध्यक्षपदी श्रीकांत नवले, बीड तालुकाध्यक्षपदी सचिन घरत तर कार्याध्यक्षपदी महेश शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सरचिटणीस अमरसिंह पंडित, युवकचे बीड जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या धोरणांना व विकासाभिमुख विचारसरणीला न्याय देत काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. युवकांना संघटनात्मक जबाबदारी देऊन आगामी निवडणुकांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग वाढविण्याचे उद्दिष्ट असल्याचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी सांगितले. गावपातळीवर पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी आणि स्थानिक जनतेपर्यंत अजितदादांच्या विकासदृष्टीचा संदेश पोहोचविण्यासाठी ही निवड महत्त्वाची ठरणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या नियुक्त्यांमुळे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला नवचैतन्य प्राप्त होईल, तसेच स्थानिक निवडणुकांमध्ये युवकांची ऊर्जा आणि सहभाग निर्णायक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विचार हा घराघरात घेऊन जाण्यासाठी आणि पक्ष विस्तार करण्याच्या उद्देशाने आज युवकांना चांगल्या पदावर काम करण्याची संधी देण्यात आली आहे. नियुक्त केलेले सर्व पदाधिकारी गावपातळीवर जाऊन पक्ष संघटन मजबूत करण्याचे काम करतील असा विश्वास आहे. पक्षाचे नेते उपमख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वात काम करण्याची संधी मिळने ही मोठी गोष्ट आहे. राष्ट्रवादी वाढविण्यासाठी तरुणांनी पुढे यावे.
>
> **–बळीराम गवते, युवक जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, बीड.**

# ऊसतोड कामगारांच्या मुलींचे शासकीय वसतीगृह गेवराई करीता इमारत भाडेतत्वावर देण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत

बीड दि. १४ (जिमाका) : लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ पुणे अंतर्गत चालविण्यात येणा-या संत भगवानबाबा ऊसतोड कामगारांच्या मुलीचे शासकीय वसतीगृह, गेवराई तालुक्याच्या हद्दीमध्ये १०० विदयार्थीनींकरीता निवासाची सोय असलेली सर्व सोयी-सुविधांनी युक्त अशी १०००० स्केअर फुट इमारत, सदर इमारतीत पर्याप्त निवासखोल्या, भोजनगृह, कार्यालय, भांडारगृह, चौकीदार निवासस्थान, स्नानगृहे, शौचालय, संरक्षण भिंत उपलब्ध असणारी इमारत भाडेतत्वावर घ्यावयाची असून अशी इमारत उपलब्ध असल्यास इमारत भाडेतत्वावर देण्याकरीता संबंधित इच्छुक इमारत मालक यांनी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सामाजिक न्याय भवन, नगर रोड बीड अथवा मागासवर्गीय मुलीचे शासकीय वसतीगृह, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नगर रोड, बीड या कार्यालयांशी दि.३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा, असे संत भागवानबाबा उसतोड कामगार, मुलींचे शासकीय वसतीगृहाचे गृहपाल यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# रामलिंग मुंडे यांना धुनकवड गणातून संधी मिळणार

बीड दि.१४ (प्रतिनिधी) - स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांचे वारे सध्या जोरात आहे उच्चशिक्षित व कर्तव्यदक्ष तरुण उमेदवार रामलिंग मुंडे यांच्या नावाचीच सर्वत्र सर्वसामान्य नागरिकांत चर्चा चालू आहे त्यांनी आतापर्यंत सर्वसामान्य जनतेसाठी खूप मोलाचे कार्य केले आहे लोकांच्या सुख दुःखात सहभागी होऊन त्यांना आधार देण्याचे तसेच शासकीय कार्यालयातील लोकांचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय देण्याचे कार्य केले आहे तसेच त्यांनी ना.पंकजा ताई मुंडे यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणूनच काम केले आहे.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पंडित जवाहरलाल नेहरू जयंती साजरी



पाटोदा दि.१४ (प्रतिनिधी)- येथील नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित, वसंतदादा पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बाल दिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. बळीराम राख सर यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सोमनाथ लांडगे यांनी करून बाल दिनाचे महत्त्व आणि पंडित नेहरू यांच्या कार्यावर ओघवता प्रकाश टाकला. या छोटे खाणी कार्यक्रमाच्या व्याख्यानात राष्ट्रीय सेवा योजनेचे सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. चंद्रकांत बनसोडे यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवन व कार्याचा सविस्तर आढावा घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. बळीराम यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांचे देशाच्या जडण घडणीतील योगदान खूप महत्त्वाचे असून त्यांचा आदर्श युवकांनी घेतला पाहिजे. असे मत व्यक्त केले . या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. प्रदीप मांजरे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. मनिषा गाढवे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील उपप्राचार्य प्रा. डॉ. सतीश माऊलगे, उपप्राचार्य प्रा. डॉ. अभय क्षीरसागर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, कार्यालयीन अधीक्षक श्री. अशोक पवार इत्यादीं बरोबरच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.



**शिवसेना (शिंदे गट)पक्षाकडून प्रभाग क्रमांक १९ (अ) बीडमधून प्रा. रामेश्वर कुंभारकर यांनी अतिशय साध्या पद्धतीने अधिकृतपणे आपल्या कुटुंबासोबत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. विजया कुंभारकर, योगेश कुंभारकर, मीना कुंभारकर**

# क्रांतीगुरु वीर लहुजी वस्ताद साळवे यांची गेवराईत भाजपकडून जयंती उत्साहात साजरी



गेवराई दि.१४ (प्रतिनिधी) - शहरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने क्रांतीगुरु वीर लहुजी वस्ताद साळवे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

क्रांती गुरु वीर लहुजी वस्ताद साळवे यांची दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ रोजी गेवराई शहरात जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. भाजपाचे युवानेते रोहित पंडित, युवानेते यशराज पंडित, युवानेते शिवराज पवार यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी क्रांती गुरु वीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष ब्रह्मदेव धुरंदरे, नगरसेवक भरत गायकवाड, सामाजिक कार्यकर्त्या सुमित्रा अत्तू थोरात, सामाजिक कार्यकर्ते अमन सुतार, पत्रकार सुभाष सुतार, शेख शहेदाद, बंडूभाऊ निकम, माऊली सुतार, नवनाथ धुरंधरे, राजेंद्र सुतार, रवी सुतार, मोहन सराटे, उज्वल सुतार, रितेश संत, मुरली सुतार यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# काडीवडगाव जि.प.शाळेत बालदिन मोठ्या उत्साहात साजरा



बीड दि.१४(प्रतिनिधी ):-वडवणी तालुक्यातील काडीवडगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन मोठ्या उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र वावळकर हे होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. बहिरवाळ सर, श्री. बडे सर, अंगणवाडी सेविका श्रीम. जयश्रीताई बादाडे, श्रीम. ललिता वावळकर, श्रीम. कांचन टिळे,श्रीम. जनाबाई मोहन राऊत इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंडित नेहरू यांच्या प्रतिमेचे पुष्प अर्पण करण्यात करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्या नंतर शाळेतील निवडक विद्यार्थ्यांनी नेहरूंच्या बाल प्रेमाबद्दल, शिक्षणाचे महत्त्व, स्वच्छता, पर्यावरण, शाळेतील मूल्य शिक्षण, तसेच आजच्या मुलांवर असलेल्या जबाबदाऱ्या या विषयांवर सुंदर, प्रेरणादायी व प्रभावी विचार मांडले. काही निवडक विद्यार्थ्यांच्या प्रभावी व आत्मविश्वासपूर्ण भाषणांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण मांडणीला उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि पालकांनी उत्स्फूर्त दाद दिली. मुलांच्या वक्तृत्व कौशल्याचे सर्वांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या भाषणानंतर शाळेतील श्री बडे सर व श्री बहिरवाळ सर यांनी आपले विचार मांडले. अध्यक्ष मार्गदर्शन करताना शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र वावळकर यांनी पंडीत नेहरूंचे बालप्रेम, शिक्षणाविषयीचे विचार मांडले विद्यार्थ्यांना बालदिनाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेची भूमिका यावर मार्गदर्शन करताना श्री रवींद्र वावळकर म्हणाले की, आपल्या शाळेतील या गोड विद्यार्थ्यांच्या ठायी असलेले विचार, सर्जनशीलता आणि आत्मविश्वासच त्यांचे उज्ज्वल भवितव्य घडवतील. त्या कामी पालक आणि शिक्षकांचे मोलाचे सहकार्य कायम राहणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अंजली हातागळे व कु. रुंजी बादाडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षकवर्ग, कर्मचारी, तसेच ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

# पिंपळनेरात साथीच्या आजाराने नागरिक हैराण

पिंपळनेर दि.१४ (प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील पिंपळनेर सह परिसरात बहुतांश गावांमध्ये सध्या ताप, खोकला, घसा दुखी, सर्दी अशा प्रकारच्या सदृश साथीच्या आजारांनी थैमान घातले आहे. तालुक्यातील सर्वच गावांमध्ये घराघरात आजारी माणसं आढळून येत आहेत. यामुळे शहरातील खासगी दवाखाने हाउसफुल झाले आहेत. तर शासकीय रुग्णालय ही रुग्णांनी भरू लागली आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. प्रशासनाने तातडीने घरोघरी जाऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जनतेमधून केली जात आहे.

पिंपळनेर शहरात दिवसा कडक ऊन व रात्री कडाक्याची थंडी पडते. यामुळे ताप, थंडी, सर्दीचे रुग्ण वाढल्याची शक्यता आहे. ग्रामीण भागासह शहरातही साथीच्या आजाराची लागण वेगाने होत असून नागरिक चिंतेत आहेत. पिंपळनेरसह गावागावांत नाले, गटारी तुंबलेल्या आहेत. अनेक गावामध्ये स्वच्छतेकडे पूर्णतः दुर्लक्ष झाले आहे. अनेक ग्रामपंचायतींचा स्वच्छता कारभार ढिसाळ असल्याचे चित्र आहे. रोगराई वाढत असतानाही प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत आहे. तरी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.अशी जनतेतून मागणी होत आहे .

# बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बाल दिन



येळंब (घाट) दि.१४ (प्रतिनिधी)- येथील बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आज दिनांक १४. नोव्हेंबर २०२५ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान व आधुनिक भारताचे शिल्पकार जवाहरलाल नेहरू यांची जयंती बालदिन म्हणून साजरी करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती देशभर 'बालदिन' साजरा करण्यात येतो. विद्यालयाचे प्राचार्य श्री राजकुमार कदम यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे ज्येष्ठ प्रा. सोंडगे बी. बी. होते तर मंचावर ज्येष्ठ प्रा. कदम एस. एस., ज्येष्ठ शिक्षक कदम बी. एस., व वरिष्ठ लिपिक सुधीर पायाळ यांची प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात पंडीत नेहरू यांच्या प्रतिमा पूजनाने व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. या प्रसंगी बोलताना प्राचार्य श्री राजकुमार कदम यांनी पंडीत नेहरू यांच्या जीवनकार्याचा विस्तृत आलेख सर्वांसमोर मांडला. यावेळी त्यांनी पंडित नेहरू यांच्या आधुनिक भारताच्या उभारणीत दिलेल्या योगदानाचे महत्त्व विषद करताना विज्ञानाभिमुख होण्याचे आवाहन केले. तर श्रीम गणगे व्ही. एम. व श्री सोंडगे बी. बी. यांनी पंडीत नेहरू ते चाचा नेहरू या प्रवासाची महती सांगितली. कार्यक्रमाचे संचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख घाटे ए. एस. यांनी केले तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक चौरे व्ही. एस. यांनी केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. पंडीत नेहरू यांना सामूहिक अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.


## जाहीर प्रगटन

प्लॉट खरेदी करणार नामे तुकाराम मोतीराम ढोबळे रा, चिंचोळी माळी ता.जि. बीड यांनी रामेश्वर मोहन कुटे रा. कुटेवाडी ता.जि.बीड यांचे मालकी व ताब्यातील बीड नगर परिषद हद्दीतील तरफ बलगुजार येथील स.नं. ५१/१ मधील प्लॉट नं. ३ ज्याची लांबी पुर्व पश्चिम दक्षिण बाजु – ३४ फुट व उत्तर बाजु ३३ फुट व रुंदी दक्षिण उत्तर पुर्व बाजु ३२ फुट व पश्चिम बाजु २८ फुट अशी असुन ज्याचे एकुण क्षे. १००५ चौ. फुट म्हणजेच ९३.४० चौ.मी.आहे.

सदर मिळकतीची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

**पुर्वेस** – २० फुट रुंदीचा रस्ता, **पश्चिमेस** – अंकुश एकनाथ शेरकर यांची जागा **दक्षिणेस** – नितीन भरतरीनाथ काळे यांचे शेत, **उत्तरेस** – प्लॉट क्र.२

वरील वर्णनातील व चतुः सिमेतील प्लॉट मी खरेदी करण्याचा ठराव केला असुन सदर प्लॉट मालकाने मला असा विश्वास दिला आहे की, सदर प्लॉट पुर्णपणे निर्वीवाद असुन सदर प्लॉटच्या संबंधाने कोणत्याही न्यायालयामध्ये वाद चालु नाही. तसेच सदर प्लॉट कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय प्रयोजनासाठी आरक्षीत झालेला नाही. तसेच सदर प्लॉटवर कोणत्याही राष्ट्रीयकृत अथवा, सहकारी, बँकेचा, पतसंस्थेचा व खाजगी व्यक्तीचा कर्ज बोजा नाही. तसेच सदर प्लॉटमध्ये प्लॉटमालकाशिवाय इतर कोणाचाही हक्क संबंध नाही.

सदर प्लॉटमध्ये ज्या कोणाचे हित व हक्क संबंध असतील अशा सर्वांनी हे जाहीर प्रगटन प्रकाशीत झाल्या पासुन १५ दिवसात आपले आक्षेप हित व हक्क संबंधाचे कागदपत्रासह खालील पत्यावर नोंदवावे. जर सदर मुदतीत कोणाचेही आक्षेप आले नाहीत तर खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

सबब हे जाहीर प्रगटण.

– संपर्काचा पत्ता –
**तुकाराम मोतीराम ढोबळे**
चिंचोळी माळी ता.जि.बीड. मो.नं. ९७६४२६०८०७

16181/13354



## जाहीरनामा

**श्री.जी.एस.खुपसे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माजलगांव जिल्हा बीड, यांचे न्यायालयात.**

कि.दि.अर्ज नंबर ७२८/२०२५ (मार्फत विधिज्ञ :– बी.आर.डक)
रत्नमाला व इतर विरुध्द निरंक

**अर्जदार :** १) रत्नमाला भ्र. माणिकराव आरसुळ. वय ८४ वर्षे, धंदा–घरकाम, रा. सांडस चिंचोली, ता. माजलगाव जि.बीड. २) सुरेश पि. माणिकराव आरसुळ, वय ५० वर्षे, धंदा–नौकरी, रा. सदर. ३) सतीश पि. माणिकराव आरसुळ, वय ४५ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर. ४) गणेश पि. माणिकराव आरसुळ, वय ४३ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर. ५) सिमा पि. माणिकराव आरसुळ (लग्नापुर्वीचे नाव), सिमा भ्र. अशोक सपकाळ (लग्नानंतरचे नाव), वय ४१ वर्षे, धंदा–घरकाम, रा. जोड हिंगणी बु. ता. धारुर जि.बीड.

विरुध्द निरंक

प्रकरण– बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नामे **माणिकराव पि. रंगनाथराव आरसुळ** हे/या दि.१२/०८/२०२४ रोजी सांडस चिंचोली, ता.माजलगाव जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आणी त्यांचे वरीलप्रमाणे अर्जदार क्र.१ ते ५ यांनी कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज केला आहे.

अर्जदार/गैरअर्जदारा शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार / गैरअर्जदारा असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार / गैरअर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक: १३/११/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**पुढील तारीखः २२/१२/२०२५.**

**आदेशावरून,**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर,माजलगांव**

पार्श्वभूमी
दि.१५ नोव्हेंबर २०२५ शनिवार
पान ६

## अंबाजोगाई न.प निवडणुकीत दोघांचे नामनिर्देशन पत्र दाखल

अंबाजोगाई दि १४ (प्रतिनिधी)– अंबाजोगाई नगर परिषद निवडणुकीत दि. १४ नोव्हेंबर शुक्रवार रोजी दोघांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे. अंबाजोगाई नगर परिषदेत एकूण प्रभाग १५ प्रभाग आहेत. गेल्या तीन दिवसात एकानेही नामनिर्देशन पत्र दाखल केले नव्हते. दि.१४ नोव्हेंबर रोजी प्रभाग क्रमांक ३ मधून (अ) सर्वसाधारण मधुन गोविंद टेकाळे (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट ) यांनी नामनिर्देशन पत्र प्राप्त आहे. तर प्रभाग क्रमांक ११ (ब) सर्वसाधारण पान २ वर



बीड : भाजपा जिल्हा सचिव शांतिनाथ डोरले यांची कन्या चि. सौ.का.कोमल आणि चि. योगेश बारवकर यांचा शुभ विवाह सोहळा सिंहगड लॉन्स येथे संपन्न झाला. याविवाह सोहळ्यास ह.भ.प. महंत शांतीब्रह्म नवनाथ बाबा, महंत श्रीराम महाराज विडेकर, मंत्री लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे, माजी खा. डॉ. प्रीतमताई मुंडे, माजी आमदार केशवराव आंधळे, प्रदेश सरचिटणीस, किरण पाटील, जिल्हा अध्यक्ष शंकर देशमुख, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, उद्योजक विवेक देशपांडे यांच्याबरोबर सामाजिक , राजकीय, औद्योगिक, सांप्रदायिक, शैक्षणिक आदीसह विविध क्षेत्रातील मान्यवरांसह मित्रपरिवार, आप्तेष्ट, नातेवाईक यांनी उपस्थित राहून डोरले परिवारातील विवाह सोहळ्यास शुभेच्छा दिल्या.

# दिवसा घरफोडी करणारा अट्टल गुन्हेगार सापळा रचून पकडला

## घरफोडीचे पाच गुन्हे उघडकीस

बीड (प्रतिनिधी):-पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी बीड जिल्हयातील चोरी, घरफोडी, दरोडे व मालाविरुध्दचे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला आदेशीत दिलेले आहेत. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे विविध पथकाने त्या दृष्टीकोनातुन वेगवेगळ्या घरफोडी करणाऱ्या आरोपींची माहीती घेवुन दिवसा घरफोडी करणारा अट्टल गुन्हेगार सापळा रचून पकडला. त्याची कसून चौकशी केली असता घरफोडीची पाच गुन्हे उघडकीस आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला दि.१२ नोव्हेंबर रोजी गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, गेवराई पोलीस ठाण्याअंतर्गत आर्म अ‍ॅक्ट मधील गुन्हा करुन मागील चार महीण्यापासुन मिळुन येत नसलेला आरोपी नागे संदीप ईश्वर भोसले ( बेलगांव ता.कर्जत जि.अहिल्यानगर ) हा गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन फाटा येथील पान २ वर





## बार्शी नाका भागात आ.संदीप क्षीरसागर यांच्या कॉर्नर सभेत हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन

बीड दि.१४(प्रतिनिधी):- बीड नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बार्शी नाका परिसरात अफसर शेख यांच्या उमेदवारी बाबत झालेल्या आमदार संदीप क्षीरसागर कॉर्नर बैठकीला आमदार संदीप क्षीरसागर , माजी आमदार सय्यद सलीम सह इतर मान्यवर उपस्थित राहिल्याने या बैठकीचे सभेत रूपांतर झाले. या बैठकीला तरुणासह वृद्धा मध्ये देखील उत्स्फूर्त प्रतिसाद पहावयास मिळाला.



या सभेची खास बाब म्हणजे उपस्थित नागरिकांनी दर्शवलेले हिंदू-मुस्लिम बांधिलकीचे ऐक्य. जय भवानी जय शिवाजी ते सलाम वालेकुम पर्यंतचा घोष एकाच मंचावर घुमल्याने वातावरणात एकात्मतेचा संदेश पसरला.संदीप क्षीरसागर आपल्या भाषणात म्हणाले की, विरोधकांचे उमेदवार अंतिम झालेले नाहीत, अजूनही गोंधळ सुरू आहे. पण आमचे मात्र एकूण ५२ उमेदवार पूर्णतः तयार आहेत. ठाम भूमिका, स्पष्ट धोरण आणि जनता आमच्यासोबत आहे. क्षीरसागर यांच्या या विधानामुळे निवडणूक वातावरणात चैतन्य निर्माण झाले असून, त्यांच्या सभेला मिळालेला प्रतिसाद लक्षवेधी पान २ वर

## गेवराई नगराध्यक्ष पदासाठी तिघांचे ५ तर सदस्य पदासाठी २२ उमेदवारी अर्ज दाखल

गेवराई दि.१४(प्रतिनिधी):- गेवराई नगर परिषदेच्या एक नगराध्यक्ष आणि २२ नगरसेवक पदासाठी होत असलेल्या निवडणुकीत दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत २७ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात झाले आहेत. यात नगराध्यक्ष पदासाठी ३ उमेदवारांनी ५ तर नगरसेवक पदासाठी २२ उमेदवारांनी आपली उमेदवारी दाखल केली असल्याची माहिती गेवराई नगरपरिषद निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार संदीप खोमणे सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी विक्रम मांडुरके आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा नायब तहसीलदार संजय सोनवणे यांनी दिली आहे. गेवराई नगर परिषद निवडणुकीसाठी दिनांक १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. दिनांक पान २ वर

## बीड नगराध्यक्ष पद हा महिलेचा अधिकार-प्रेमलता चांदणे



बीड दि.१४(प्रतिनिधी):- बीड नगरपरिषद नगरअध्यक्षपद हे अनुसूचित जाती महिला राखीव आहे मग महिलेसाठी राखीव असणारे हे संविधानिक पद हा महिलेचाच अधिकार असावा, महिलेच्या नावाखाली पुरुषाने अधिकार गाजवू नये महिला कुठलेही पद सांभाळायला सक्षम आहेत. असे मत बीड नगरपालिकेच्या माजी सभापती श्रीमती प्रेमलताताई आत्माराम चांदणे यांनी प्रसिद्धी पत्रकात दिले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने महिलांना समान नागरी हक्क दिलेले आहेत आरक्षण दिलेले आहे महिलांना आरक्षण नसेल तर पुरुष पान २ वर

## माजी जि.प.सदस्य गो.गो.मिसाळ यांच्या अमृत महोत्सव अभिष्टचिंतन सोहळ्यास गर्दी



पिंपळवंडी दि.१४(प्रतिनिधी):- अंमळनेर गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य गो.गो.मिसाळ सर यांचा दि.१३ नोव्हेंबर गुरुवार रोजी अंमळनेर येथे भारत पेट्रोल पंपाजवळील श्री.गणेश मंगल कार्यालयात अमृत महोत्सव अभिष्टचिंतन सोहळा (७५ वा वाढदिवस) संत-महंतांच्या व मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य-दिव्य नेत्रदिपक सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.या सोहळ्याला महंत न्यायाचार्य डॉ.नामदेवशास्त्री महाराज, वेदांताचार्य विवेकानंद शास्त्री महाराज,ह.भ.प.राधाताई सानप महाराज, ह.भ.प.अंजलीताई केंद्रे, ह.भ.प.पांडुरंग महाराज कुंभार, ह.भ.प.काशिनाथ शास्त्री महाराज, ह.भ.प.महेंद्र मळेकर महाराज, ह.भ.प.अभिमन्यू खाडे महाराज, ह.भ.प.अतुल महाराज आदींची उपस्थिती होती.याप्रसंगी प्रथम सकाळी ९ वाजता गो.गो.मिसाळ सर यांची सपत्नीक आकर्षक घोडे स्वार रथातून,बँड पथक,हालगी वाद्याच्या निनादात फटाक्यांच्या आतिषबाजीत भव्य-दिव्य मिरवणूक काढण्यात येऊन २५१ किलो वजनाचा मनमोहक पुष्पहार घालून स्वागत केले.त्यानंतर गो.गो.मिसाळ सर पान २ वर



कवडगाव- संजय आंधळे मित्र मंडळाच्या व भाग्यलक्ष्मी डेव्हलपर्स च्या वतीने संजय आंधळे यांच्या वाढदिवसाच्या खर्च टाळून डॉ. संपदा मुंडे यांच्या कुटुंबास आर्थिक मदत केली.

## प्रभाग ९ मधून शेख मेहराज यांचा उमेदवारी अर्ज दाखल

बीड दि.१४(प्रतिनिधी):- शहरातील नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभाग ९ मध्ये आज मोठी राजकीय घडामोड घडली. सामाजिक कार्यात सदैव आघाडीवर असलेले शेख मेहराज यांनी आज नगरपालिका सदस्यपदासाठी आपला अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यासाठी त्यांच्या सोबत उपस्थित असलेल्या समर्थकांच्या उत्स्फूर्त गर्दीने प्रभागात निवडणूक रंगतदार होण्याचे संकेत दिले आहेत. स्थानिक प्रश्न,



पाणीटंचाई, रस्त्यांची अवस्था आणि मूलभूत सुविधा या प्रमुख मुद्द्यांसह विकासाला नवी दिशा देण्याचे आश्वासन शेख मेहराज यांनी यावेळी व्यक्त केले. प्रभागातील नागरिकांमध्ये त्यांचा सातत्यपूर्ण संपर्क, विनम्र स्वभाव आणि समस्यांवर त्वरित प्रतिसाद देण्याची पद्धत यामुळे त्यांची पान २ वर

## लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यास ग्रीन वर्ल्ड को.प्राईड-२०२५ पुरस्कार जाहीर



वडवणी (प्रतिनिधी) :- जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यास ग्रीन वर्ल्ड को प्राईड २०२५ चा प्रतिष्ठेचा व मानाचा पुरस्कार जाहीर झाला.याबद्दल कारखाना चेअरमन, व्हा.चेअरमन, कार्यकारी संचालकांसह कारखाना प्रशासनावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. वर्ल्ड व कॉसमॉस को. ऑपरेटिव्ह बँक लि. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या संस्था,व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.त्याप्रमाणे या वर्षीचा जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्यल दिला जाणारा ग्रीन वर्ल्ड को. प्राईड-२०२५ हा पुरस्कार तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर कारखान्यास नुकताच घोषीत झाला.तसे पत्र ग्रीन वर्ल्ड पब्लीकेशनच्या वतीने सोळंके कारखान्यास कळविले असल्याची माहिती चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके यांनी दिली. ते म्हणाले की, लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याने ऊस उत्पादक सभासदांच्या आर्थिक हिताचे रक्षण पान २ वर

# सोमवारची गर्दी टाळण्यासाठी आज आणि उद्या ही उमेदवारांनी अर्ज दाखल करावेत



गेवराई दि १४( दिनकर शिंदे)- गेवराई नगर परिषदेच्या नगराध्यक्ष व २२ नगरसेवक पदासाठी दिनांक १० ते १७ पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालावधी आहे. सोमवार शेवटचा दिवस असल्याने उमेदवारांची तारांबळ होवु नये यासाठी शनिवार व रविवारी देखील उमेदवारी अर्ज भरता येणार आहे तरी सोमवारी होणारी संभाव्य गर्दी टाळण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी १५ व १६ नोव्हेंबर रोजी आपली उमेदवारी अर्ज दाखल करावेत असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार संदीप खोमणे सहाय्यक निवडणूक

### गेवराई निवडणूक अधिकाऱ्यांचे आवाहन

अधिकारी विक्रम मांडुरके आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी संजय सोनवणे यांनी केले आहे. १७ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करून घेतले जाणार असले तरी १६ रोजी रविवारची सुट्टी असतानाही फॉर्म घेण्यात येतील तरी गेवराई शहरातील इच्छुक उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल करून घ्यावेत, म्हणजे दिनांक १७ ऑक्टोबर सोमवार रोजी संकेतस्थळ व्यस्त होणार नाही आणि गर्दीही टळेल असे आवाहन गेवराई नगर परिषद पान २ वर

## नवजात बालकाच्या उपचारासाठी माजी आ.धोंडे यांच्या प्रयत्नाने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ५० हजारांची मदत

आष्टी(प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील पाटण सांगवी येथील शितल ऋषिकेश जगताप यांच्या नवजात बालकांचे उपचारासाठी माजी आ. भीमराव धोंडे यांच्या प्रयत्नाने आणि सरपंच दादासाहेब जगताप यांच्या पाठपुराव्यामुळे मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ५० हजारांचे मदत मिळाली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून राज्यातील गोरगरिबांना दवाखान्यात उपचारासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली जाते. सरपंच दादासाहेब जगताप यांच्या गावातील शितल ऋषिकेश जगताप यांचा नवजात बालक अहिल्या नगर येथील डॉ. दिपक कर्पे यांच्या सिध्दीविनायक चिल्ड्रन हॉस्पिटलमध्ये असताना पैशाची गरज होती. त्यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्याने त्यांच्या कडे पैसे उपलब्ध नव्हते. सरपंच दादासाहेब जगताप यांच्या प्रयत्नाने माजी.आमदार भीमराव धोंडे यांच्याकडे त्यांनी पाठपुरावा केला आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळविण्यासाठी प्रयत्न केला. पन्नास हजार रुपये आर्थिक मदत मिळाली आहे. त्याबद्दल जगताप कुटुंबियांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी आमदार भीमराव धोंडे, सरपंच दादासाहेब जगताप यांना धन्यवाद मानले आहेत.

### बीडमध्ये दादांच्या राष्ट्रवादीचा नवा अध्याय

## जिल्हा उपाध्यक्षपदी श्रीकांत नवले-बळीराम गवते



बीड दि.१४(प्रतिनिधी):- आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) कडून युवक संघटनांना बळकट बीडमध्ये दादांच्या राष्ट्रवादीचा करण्याचा निर्धार करण्यात आला असून बीड जिल्ह्यात युवक पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहे. युवकांना नेतृत्वाची संधी देण्यात आली असून युवकच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी श्रीकांत नवले, यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सरचिटणीस अमरसिंह पंडित, युवकचे बीड जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. दरम्यान, अजितदादांच्या विकासदृष्टीचा संदेश घरा-घरात पोहोचवा, गाव पातळीवर पक्ष संघटन मजबूत करा असे प्रतिपादन यावेळी युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी केले. नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या धोरणांना व विकासाभिमुख विचारसरणीला न्याय देत काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. युवकांना संघटनात्मक जबाबदारी देऊन आगामी पान २ वर

## मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला

बीड दि.१४ (प्रतिनिधी):- सध्या गल्लोगल्ली मोकाट कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणावर वाढला असुन झुंडीच्या झुंडी रस्त्यावर रात्रीच्यावेळी दिसत असुन जाणाऱ्या-येणाऱ्या नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. याचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.

## ढेकणमोहा पं.स.गणाच्या विकासासाठी हरिभाऊ शेळके शिवसेनेकडून लढणार



बीड दि.१४ (प्रतिनिधी) :- तालुक्यातील ढेकणमोहा पंचायत समिती गणात हरिभाऊ शेळके यांच्या उमेदवारीबद्दल चर्चा होत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून गणाचा विकास करण्यासाठी शिवसेनेकडून निवडणूक लढवण्यासाठी हरिभाऊ शेळके इच्छूक आहेत. स्थानिक प्रश्नांवर आवाज उठविणे आणि संभाव्य भ्रष्टाचारास विरोध करण्याच्या मुद्द्यांमुळे शेळके यांनी जनमानसात एक वेगळी छाप निर्माण केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, हरिभाऊ शेळके यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसोबत काम करण्यास सुरुवात केली आहे. ढेकणमोहा परिसरात शिवसेनेला आधीपासूनच मजबूत आधार मिळत असल्याने शेळके यांच्या पुढील राजकीय प्रवासाबद्दल उत्सुकता वाढली आहे. स्थानिक पातळीवरील समस्या, विकासकामे पान २ वर





**पाहिजेत**

**श्री महालक्ष्मी अ‍ॅटो एजन्सी करिता**

1) कॉम्प्युटर ऑपरेटर - 1
अनुभव असणाऱ्यास प्राधान्य
2) सेल्समन/मार्केटींग - 1
3) एजन्सीवर कामा करिता - 2

:: संपर्क ::
हॉटेल शांताईच्या पाठिमागे, शाहुनगर, बीड.
Mob.9421350354

**पाहिजेत**

पेपर वाटण्यासाठी मुले पाहीजेत.
योग्य पगार दिला जाईल.
– संपर्क–
लक्ष्मी न्युज पेपर एजन्सी,बीड.
मोबा.८२०८३४३५६३


## जाहिर प्रगटन

दिनांक १४.११.२०२५

**जाहिर प्रगटन देणार– १) शरीफ मोहमद्द हुशेन कुरेशी,**
**२) एकबाल मंहमद हुशेन कुरेशी,**
**३) फेरोजा महमंद हुशेन कुरेशी,**
**४) तय्यब महमंद हुशेन कुरेशी**

सर्व राहणार वडवणी ता.वडवणी जि.बीड मो.नं.९८२२७२४१६४ सर्व जनतेस मा. जाहिर प्रघटनाद्वारे कळवण्यात येते की जाहिर प्रगटन देणार क्र. १ ते ४ यांनी शिवार वडवणी नगर पंचायत हद्दीतील गट क्रमांक ६५७ मधील एकुण ०४ एकर सदरची जागा आमच्या मालकीची व कब्जा वहिवाटीमध्ये असलेल्या जागेचा व्यवहार हा आम्ही खालील व्यक्तीशी केलला आहे.

१) सिध्देश्वर अभिमन्यु मस्के रा.बाहेगव्हाण ता.वडवणी.जि.बीड

२) लतीफ लाला खान पठाण रा.चिखल बीड ता.वडवणी.जि.बीड सदर जमीनीची चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस-३० फुट रस्ता,पश्चिम :-प्रगटन देणार यांची जागा, दक्षिण :- प्रगटण देणार यांची जागा बीड परळी हायवे रस्ता वरील,उत्तर :- ३० फुट रस्ता

उपरोक्त चतु: सिमा अंतर्गत असलेली जमीनीचे मालक व कब्जेदार प्रगटन देणार यांचय उपरोक्त जमीनचे सातबारा पत्रकावर मालकी व कब्जेदार ची नावे आहेत सदर जमीन कायदेशीर कब्जे व मालकीची असुन सुध्दा काही लोकांन कडून आम्हाला धमकावन्याचे व जमीनीत अडतळे निर्माण करण्याचे प्रयत्न करीत असतील तर त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करुन आमची समाजमधील प्रतीमा खराब करुन वर होणारे आर्थिक नुकसान भरपाई कायदेशीर रित्या वसुल केली जाईल याची नोंद घ्यावी.

त्या करीता सबब जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.

**लतीफ लालाखाँ पठाण**
रा.चिखलबीड ता.वडवणी
जि.बिड मो.नं.९९२३९८०५१४

१६१८२/१३३५३